# मराठी विभाग

**जैसी पुष्पामाजी पुष्पमोगरी**
**परिमळामाजी कस्तुरी**
**तैसी भाषामाजी साजिरी**
**भाषा मराठीया**
**– फादर स्टीफन्स**

# क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले

कु. सुकृता सुनील शिंदे
(एम.ए.-१ (मराठी))

दारिद्र्य, अज्ञान व भोळ्या धर्म समजुतींचा अंधार नाहीसा करण्यासाठी आद्य समाजक्रांतिकारक ज्योतीबा फुल्यांनी ज्ञानाचा दिवा लावला. त्यातील ज्योत बनले ज्योतीबा आणि तेल झाल्या सावित्रीबाई ! या दिव्याने प्रकाशाचा पहिला किरण स्त्री शूद्रांच्या जीवनात आणला, पहिल्या शाळेच्या रुपाने.

आज प्रत्येक मुलगी शाळेत, महाविद्यालयात किंवा प्रत्येक क्षेत्रात शिकत आहे. तिला पुढे शिक्षण घेऊन काहीतरी करुन दाखवावेसे वाटते. हे सर्व आजही प्रत्येक मुलगी जिद्दीने बोलते आहे. प्रत्यक्षात करते आहे, हे सर्व मी तर म्हणेल की या माय सावित्रीच्या कृपेनेच. स्त्रीला दास्यत्वातून मुक्ती देणाऱ्या सावित्रीबाई फुले यांचा क्रांतीज्योती म्हणून गौरव होतो. त्यांनी समाजातील अज्ञानाचे अंधारे कोपरे प्रकाशमान केले.

स्त्रियांनी राष्ट्राला वैभवाच्या शिखरावर नेऊन पोहचविले आहे. प्रत्येक व्यक्तीच्या जडणघडणीत आईचा सिंहाचा वाटा असतो. हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज घडले जिजाबाईंच्या कुशीत त्यांची आई त्यांच्यासाठी आई भवानी ठरली. ज्या स्त्रियांनी जीवनाचा नवा प्राकश दिला, त्याच या राष्ट्राच्या आधारभूत झाल्या आहेत. महाराणी ताराबाई, क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले, श्रीमती इंदिरा गांधी, मदर तेरेसा, किरण बेदी यांच्यासारख्या थोर महिला भारतीय लोकजीवनाच्या दीपस्तंभ आहेत.

ज्योतिबा आणि सावित्रीबाई या जोडप्याच्या हातून स्त्रियांच्या शिक्षणाचे आणि इतर सामाजिक जागृतीचे जे महान कार्य झाले, त्या मागची मुख्य शक्ती होती ती एक स्त्रीच त्या होत्या ज्योतीबांची मावसबहिण सगुणाबाई क्षीरसागर. अविद्येमुळे माणसाच्या आयुष्यात किती अनर्थ घडतो, हे सूत्र मांडणाऱ्या म. फुले यांनी सावित्रीबाईंना शिक्षणाचे धडे देऊन पहिली भारतीय शिक्षिका घडविली. सावित्रीबाईंच्या वाट्याला प्रचंड दुःख अवहेलना आल्या; पण उपेक्षितांच्या उज्वल भविष्यासाठी या माऊलीने वर्तमानातल्या जीवघेण्या यातना सहन केल्या आणि ज्योतीबांना मनोमन साथ दिली. सावित्रीबाई फुल्यांनी विद्येची महान क्रांती केली. या महान रणरागिणीने जीवनात घडलेल्या अनेक जीवघेण्या घटनांना सामोरे जाऊन, त्यातून मार्ग काढून बहुजनांच्या उद्धाराचे कार्य तडीस नेले. त्यासाठी त्यांना कधी चार दिवस सुखाने जगता आले नाही. आयुष्यभर हाती घेतलेले सामाजिक क्रांतीचे व्रत न डगमगता चालवताना, पेलवताना प्रत्येक क्षणी त्यांना दुःखाचे अश्रू आणि भाकरीचा घास बरोबरच पोटात ढकलावा लागला होता.

ज्योतीरावांनी अस्पृश्यांचा पिण्याच्या पाण्याचा विषय काढताच स्वतःच पुढाकार घेऊन सावित्रीबाईंनी आपली वाड्यातील विहीर अस्पृश्यांसाठी खुलीकरून दिली. ब्राह्मणांनी म. फुल्यांच्या शाळेत शिक्षक मिळू नये, अशी ज्योतीरावांची कोंडी केली असता सावित्रीबाई स्वतः शिक्षिका म्हणून शाळेत उभ्या राहिल्या सनातन्यांच्या बालेकिल्ल्यांत असे धैर्य दाखविणे सोपी गोष्ट नव्हती. सामाजिक कार्य व शाळा चालविण्यासाठी जेव्हा ज्योतीरावांना घर सोडायची वेळ आली तेव्हा सावित्रीबाईंनी ज्योतीरावांना साथ देऊन आपल्या कार्याला प्राधान्य दिले. सावित्रीबाईंच्या हाताखाली मुक्ता साळवे नावाची पहिली दलित प्रज्ञावंत तयार झाली. ज्योतिराव फुले व सावित्रीबाईंच्या वैचारिक शिकवणितून व संस्कारातून धोंडिराम नामदेव कुंभार व एकनाथ रोडे यांसारखी खुनी, दरोडेखोर माणसे सत्शील व संत बनून विद्वान व अभ्यासू प्रचारक बनली. त्यांच्या हातून पुढे बहुजन समाजाची मोठी सेवा झाली. एवढेच लव्हे तर म. गांधींच्याही अगोदर पाऊनशे वर्षांपूर्वी सावित्रीबाईंनी स्वतः चरखा व खादीचा पुरस्कार केला होता. फावल्या वेळात सावित्रीबाई आपल्या सहकारी महिलांच्या मदतीने सूतकताई करून घेत होत्या व कोष्टाच्या साह्याने खादीची वस्त्रे विणून खादीचा प्रचार व प्रसार करीत असत. म्हणून म. गांधींच्या अगोदर खादीचा वापर व प्रचार-प्रसार करणारी एकमेव महिला म्हणजे सावित्रीबाई फुले या होय. ब्राम्हणी विवाहविधींना फाटा देण्यासाठी सत्यशोधक विवाह विधी प्रचलित करून पहिले तीन सत्यशोधक विवाह सावित्रीबाईंच्या पुढाकाराने घडून आले होते.

एवढ्या विशाल विचाराच्या या महामानवाला येथील काही धर्मांधांनी त्यांना केवळ दलितांचे मसीहा म्हणून जाणीवपूर्वक इतर समाजाला त्यांच्या कार्यापासून विचारापासून दूर ठेवण्याचा प्रयत्न केला आहे. कारण, दलितांचे मसीहा म्हटल्यामुळे इतर समाज म्हणतो आमचा काय संबंध? डॉ. बाबासाहेबांची एवढी प्रचंड उंची आहे की त्यांच्या उंचीपर्यंत आमची दृष्टीही पोहचू शकत नाही. त्यांना फक्त दलितांचे मसीहा म्हणून त्यांची उंची कमी करण्याचा प्रयत्न होतोय सावधान !

डॉ. बाबासाहेबांच्या राज्यघटनेने एका फटक्यात देशातील सर्व नागरिकांना समान हक्क अधिकार दिले. राज्यघटनेमुळे गुन्हा करणाऱ्याला आरोपीच्या पिंजऱ्यात उभे करता येते. अगदी धर्मप्रमुख म्हणून माज आलेल्या 'आसाराम' सारख्या भोंदूलाही मुसक्या बांधून न्यायालयापुढे उभे करता येते. हा चमत्कार केवळ राज्यघटनेचा आहे. त्याचबरोबर राज्यघटनेच्या आगोदर या देशाचा राजा राणीच्या पोटी पैदा व्हायचा (अपवाद छत्रपती ) परंतु, राज्यघटनेमुळे भारताचा राजा आता राणीच्या पोटी पैदा होत नाही. तर जनतेने केलेल्या मतपेटीतून पैदा होतो ही ताकद देणारे बाबासाहेब आणि सर्वांच्या मताला ''एक मत, एक मूल्य'' मग, ते मत राष्ट्रपतीचे असो वा सामान्य नागरिकाचे त्या दोघांच्या मताची किंमत ही सारखीच आहे. परंतु आम्ही साधा त्या अधिकाराचा वापरही कधी चांगल्या प्रकारे करत नाही आणि स्वत:च्याच विकासाला बाधा आणणारेही आम्हीच आहोत. याचाच फायदा काही दीडदमडीचे जातीयवादी घेतात आणि राज्यघटनेत बदल करू अशी ओरड करतात. गरज आहे आपण सावध राहण्याची !

ओ.बी.सींच्या प्रश्नावर मंत्रीपदाला लाथ मारणारे, स्त्रीयांच्या हक्कासाठी हिंदु-कोड बिल संसदेत पास झाले नाही म्हणून नेहरुंच्या मंत्रीमंडळातून बाहेर पडणारे, आदिवासी समाजाचा एकही नेता राज्यघटनेच्या मसुदा समितीत सदस्य नसतानाही त्यांना विशेष सवलत व आरक्षण देणारे बाबासाहेब आम्हाला कळू नयेत यापेक्षा मोठे दुर्दैव ते आमचे कोणते असणार ! कामगारांचे प्रश्न, अर्थव्यवस्था, कायदा, पाणीप्रश्न असे कोणतेच क्षेत्र नाही ज्या क्षेत्रात या महामानवाने आपले योगदान दिले नाही. परंतु ना कधी अर्थशास्त्राच्या विषयात या महामानवाचा एखादा सिद्धांत दिला ना कधी विकासासाठी त्यांच्या विचारांचा वापर केला.

कदाचित येथील जातीयतेने बरबटलेल्यांना या महामानवाचे कार्य सामान्य जनतेपर्यंत येवू द्यायचे नसेल परंतु त्यांना हे माहित नसावे की जगाने त्यांचा किती सन्मान केला आहे. ते आता हेच पहाता मागील दोनवर्षापूर्वी अमेरीकेने मागील दोनशे वर्षातील सर्वात विद्वान, हुशार व जिज्ञासू व्यक्ती कोण यासाठी जगभरातील तब्बल दोनशे विद्वानांची यादी तयार केली पण या सर्वांवर मात करत हा भारताचा कोहिनूरच जगातील एक नंबरचा विद्वान ठरला. पण त्यांचा गौरवही येथील जातीय मिडीयाने केला नाही. कादाचित या महासत्तेने केलेला हा गौरव त्यांच्या पचनी पडला नसावा. म्हणून तर एका इलेक्ट्रॉनिक मिडीया, 'आयबीएन लोकमतने' शोध घेतला तो मागील पन्नास वर्षातील ग्रेटेस्ट इंडियनचा आणि तोही अफ्टर गांधी ! म्हणजे येथेसुद्धा या मिडीयाने आपली लायकी किती खालच्या स्तराची आहे हे दाखवूंन दिलेच पण जनतेनेही त्यांना जश्यास तसे उत्तर देऊन शेवटी डॉ. बाबासाहेबांनाच ग्रेटेस्ट इंडियन ठरवले. केवळ आज कालच्या मिडीयाच्या धर्मांध वृत्तीमुळे पुढे आलेल्या दिडदमडीच्यांना या महामानवाच्या पंक्तीत बसवणे हे येथील जनतेला अवडणारे नाही हेच यातून दिसून येते. बरे झाले या रेसमध्ये त्यांनी त्यांच्या लाडक्या आसारामला उतरवले नाही. नाहीतर त्यांना तोंड दाखवायलाही जागा उरली नसती.

परंतु या दोन्ही घटनांवरुन एवढे मात्र स्पष्ट होते की या महामानवाने केलेले कार्य हे कोण्या एका जाती, धर्म, प्रांत यासाठी केलेले नव्हेते तर अखंड मानवतेच्या कल्याणासाठी त्यांचे कार्य होते. म्हणूनच तर ते –

जागतिक विद्वत्तेचे द ग्रेटेस्ट इंडियन ठरले,

अशा या महामानवाला मनापासून जय भिम !

* * *

# संस्कारामागील विज्ञान

**कु. सात्विका सुनील शिंदे**
(एफ.वाय.बी.एस्सी.)

आजच्या नवयुगात विज्ञान आणि प्रगती या एकाच नाण्याच्या दोन बाजू होत. विज्ञानाशी संबंधीत बऱ्याच गोष्टी या आजकाल नावारुपाला आल्या असे म्हटले जाते; पण खरेच असे आहे का? कधी विचार केला का आपण या गोष्टींचा? कारण आपल्या जीवनात बऱ्याच अशा गोष्टी आहेत की, ज्या विचार करायला लावतात, की विज्ञान आत्ताचे की पूर्वीचे?

प्राचीन काळापासून चालत आलेले यज्ञातील विधी यांचा अप्रत्यक्ष संबंध वातावरण शुद्धतेशी आहे, हे सर्वांनाच माहित आहे. यज्ञात वापरले जाणारे साजूक तूप, धूप, कापूर यांसारख्या पवित्र गोष्टींचा हवनातून निर्माण होणारा धूर. सुवास हा आजूबाजूच्या वातावरणाची शुद्धता करण्याचे काम करतो. घरातील आजी, आई ग्रहणाच्या वेळेस जास्त बाहेर पडण्यापासून रोखतात याचे महत्त्वाचे कारण म्हणजे ग्रहणाच्या वेळी बदललेले वातावरण हे सूक्ष्मजीवांच्या वाढीला अनुकूल असते. त्याचा परिणाम आपल्या आरोग्यावर होऊ नये, म्हणून जास्त काळ बाहेर पडण्याचे टाळावे. एकूण काय तर... सुक्ष्मजीव हे हजारो वर्षांपूर्वीही होते. आताही आहेत आणि त्यांचे अस्तित्व पुढेही राहणार आहे.

जीवनात अशा बऱ्याच गोष्टी आपण आसपास बघतो की, त्या छोट्या गोष्टी म्हणून त्यांकडे दुर्लक्ष केले जाते; पण त्यावर जर विचार केला, तर त्या छोट्या गोष्टी या विज्ञानाशी जोडल्या गेलेल्या आहेत. याचेच एक उदाहरण म्हणजे आपण बऱ्याच वेळेस बघतो की, जेव्हा एखादे छोटे मूल मातीत खेळत असते तेव्हा तीच माती त्याच्या पोटात जाऊ नये म्हणून त्याची आई त्याची पुरेपुर काळजी घेत असते आणि त्याचे कारण पोट दुखू नये असे सांगितले जाते; पण आपण कधी विचार केला आहे का? या मातीत असे कुठले घटक असतात की जे पोटात गेल्यानंतर त्रास होतो? पण वैज्ञानिकदृष्ट्या अभ्यास करून या गोष्टी सिद्ध झाल्या आहेत की, मातीमध्ये असंख्य प्रकारचे सूक्ष्मजीव असतात जे मानवी शरीराला अपायकारक असतात.

घरगूती पद्धतीने बनवले जाणारे दही, ताक, इडली इ. सारखे पदार्थ चविष्ट लागतात. त्याच्या पाठीमागचे मूळ कारण हे सूक्ष्मजीवांशी जोडलेले आहे. त्याच्यातली पौष्टिकता वाढण्याचे काम सूक्ष्मजीव करतात; परंतु हे बनवताना घरी घेतली जाणारी काळजी आपल्याला हे शिकवते की, हेच सूक्ष्मजीव जर का प्रमाणापेक्षा जास्त संपर्कात आले तर त्याचाही आरोग्याला धोका संभवतो आणि याच सूक्ष्मजीवांचा अभ्यास म्हणजे सूक्ष्मजीवशास्त्र हे सूक्ष्मजीवशास्त्र आपल्या सर्वांशी जोडलेले आहे. सूक्ष्मजीवशास्त्र म्हणजे अगदी सूक्ष्मजीवांचा अभ्यास यामध्ये विषाणू (तळींगी), जीवाणू (इरलींशीळर) यांचा समावेश होतो. हे सूक्ष्मजीव इतके सूक्ष्म असतात की १एमएम जागेत हजारो सूक्ष्मजीव राहू शकतात.

सध्या आपण पाहत आहोत की साध्या साध्या तापानेसुद्धा मृत्युशी झुंज देणारी माणसे आहेत; परंतु अशा मोठ्या आजारांसाठी कारणीभूत असलेल्या सूक्ष्मजीवांची माहितीसुद्धा आपल्याला नसते. सध्या AIDS या आजाराचे थैमान सुरु आहे. AIDS हा HIV मुळे (Human Immunodeficiency Virus) होतो; तसेच स्वाईन फ्लू जो की $H_1N_1$ च्या विषाणुंमुळे पसरतो. असे अनेक विषाणु आपल्या दैनंदिन जीवनाशी जोडलेले आहेत; पण म्हणतात ना प्रत्येक नाण्याला दोन बाजू असतात. हे जीवाणू असे घातक आहेत तसेच ते कधीकधी फायदेशीरही ठरतात.

यासाठी मुख्य उदाहरण म्हणजे E.Coli हा सूक्ष्मजीव आपल्या पचनसंस्थेत उपस्थित असतो. हा सूक्ष्मजीव आपली पचनशक्ती वाढवतो आणि याच कारणाने शरीरातल्या जीवनसत्व ब-१२ चे प्रमाण संतुलित राहते.

या जिवाणूंचे पृथ्वीच्या प्रत्येक स्तरात तितकेच महत्त्व आहे. अगदी पर्यावरणाच्या प्रत्येक भागापासून ते मानवी जीवनातील त्यांचे स्थान असामान्य आहे आणि म्हणूनच जिवाणूंशिवाय पृथ्वीवरच्या जीवनाला आपण जीवन म्हणूच शकत नाही.

एक महत्त्वाची गोष्ट सांगायची म्हणजे या सूक्ष्म जीवांची वाढ अतिशय वेगाने होत असते. काही मिनीटांतच त्यांची संख्या दुपटीने वाढत असते. उदाहरणच घ्यायचे झाले, तर E. Coli MM घ्या ना! या E. Coli ची वाढ झाली ती फक्त ४३ तासांतच ! त्या एका पेशीपासून पुरेसा E. Coli संपूर्ण पृथ्वी सामावून घेईल.

पण आपण भाग्यवंत आहोत की, बऱ्याच जीवाणूंचा नाश हा त्यांच्यातील परस्पर स्पर्धेमुळे होतो. ही स्पर्धा त्यांच्या जीवनासाठी लागणाऱ्या अन्नटघकामुळे असते.

याविषयी जितके सांगावे तितके कमीच आहे; कारण सूक्ष्मजीवशास्त्राचे मानवी जीवनातील महत्त्व अनन्यसाधारण आहे.

* * *

# सहस्त्रधारांचे शिवालय : 'कोतुळेश्वर'

डॉ. सुनील शिंदे

गडदगर्द रानवाटा, मोहून घेणारी हिरवाई, गड-किल्यांचा राकट प्रदेश, धरण-बांध बंधाऱ्यांचा मोहक तालुका, निळ्याभोर आकाशाशी सार्थ स्पर्धा करणाऱ्या सह्य शिखरांच्या रांगा अशा वैशिष्ट्यांनी परिचित असणारा अकोले तालुका - प्राचीन परंपरा मिरवणाऱ्या शिवालयांनी, देवालयांनीही चिरपरिचित आहे.

अकोल्याच्या दक्षिणेकडील ढग्या डोंगरापलिकडले कोतूळ. गल्ली बोळाचं, छोट्या छोट्या घराचं, थापटी कौलारु घरांचं - मोजक्या दुकानांचं, व्यावसायिक कर्म धर्म आवर्जून जपणाऱ्या विविध जाती जमातींच्या कारागिरांचं, शांत स्वस्थ खेडेगाव कोतूळ. पेशवाईतील साडेतीन शहाण्यांपैकी प्रसिद्ध शहाणा विठ्ठल सुंदर परशरामी हा कोतुळचाच ! खरं तर कोतूळ प्रसिद्ध आहे ते कोतुळेश्वर शिवालयामुळे. तिथल्या महाकाय खडकांमुळे. पावसाळ्यात कधी काळी रोरावत, फुसांडत वाहणाऱ्या मुळा नदीच्या पात्राने मुळेच्या पात्रातले मोठे मोठे खडक, तिथल्या सहस्त्रधारा (लवणस्तंभ) विख्यात. शांत-सुंदर, नितांत रमणीय, मनमोहक, धीर गंभीर, पावन अनुभूती देणारं कोतुळश्वर मंदीर आणि भोवतालचा परिसर भुरळ पाडणारा.

कोतुळेश्वराचे मंदिर वेधक आहे. मुळ गाभाऱ्यातील पिंडी आकर्षक, मनोहारी आहे. झरोक्यातून डोकावणारा व थेट पिंडीवर पडणारा प्रकाशझोत मूळच्या सौंदर्यात भर घालतो. सभामंडपातील विशाल नंदी वेधक आहे. गाभाऱ्याचे पुरातन वैशिष्ट्य, रचना कायम ठेवून अलीकडेच मंदिराचा नव्याने जीर्णोद्धार केला गेला आहे. भव्य सभामंडप पहावयास मिळतो. कोतुळेश्वर ग्रामदैवत, अकोले शहरापासून १९ कि.मी. अंतरावर निसर्ग वैभवाने, वनराईत विसावलेले ऐतिहासिक, पौराणिक वारसा असलेले हे लक्षणीय शिवालय.

महर्षि व्यासांच्या महाभारतातील 'जैमिनी अश्वमेध' या स्वतंत्र लेखनातही 'कोतुळेश्वर' अर्थात 'कुन्तलेश्वर' या देवस्थानाचा उल्लेख आला आहे. भागवतभक्त चंद्रहास या दानशूर राजाची कोतूल अथवा कुंतलपूर नगरी पुढे शब्द अपभ्रंशाने कोतूळ किंवा कोतुळेश्वर अशा नावाने परिचित झाली ! याच ठिकाणी पांडवांचा विश्वविजयी अश्व अडविण्यात आल्याची कथा सांगितली गेली आहे. महाशिवरात्रीस या शिव मंदिरात मोठी यात्रा भरते. तीन ते चार लाख भाविक कोतुळेश्वराच्या दर्शनाकरीता येत असतात. मुळा नदीच्या तिरावर वसलेल्या कोतुळेश्वर परिसरात कधीकाळी सहस्त्रधारा पडायच्या. सहस्त्रधारांचे वेगळे वैशिष्य वरच्या बाजूला असलेला वेधक मोठा खडक. खाली कोसळणाऱ्या सहस्त्रधारांनी अवघा भाग ओला चिंब व्हायचा. भक्तीचं अनोखं दर्शन मानलं गेलं. पूर्वी प्रत्येक एकादशीला भंडारा व्हायचा. सध्या नियमित चालणाऱ्या भजनांचा नाद सुखावतो.

धार्मिक विधी, उत्सव, हरिनाम सप्ताहांसारखे उपक्रमही देवस्थान समितीच्या वतीने पार पडतात. कोतूळ गावात अनेक जुने वाडे पहावयास मिळतात. वाड्यांचे घडवलेले दगडी जोते तसेच कोरीव लाकडी दरवाजे समृद्धीच्या खाणाखुणा जपून आहेत. प्राचीन काळात मोठी बाजारपेठ असण्याची शक्यता आहे, कारण रस्त्याच्या कडेलाच दिमाखदार वाडे, कातीव जोते, पुरातन समृद्धीची साक्ष देतात. ब्रिटीशकालीन उपलब्ध कागदपत्रांच्या आधारे पुढील मजकूर पहावयास मिळतो.

Kotul is a small and beautiful village near Akole Taluka and in Ahmednagar District. In the British era British officers used to call Kotul as a Mahabaleshwar in the Ahmadnagar District. One can visit the beautiful Temple called Kotuleshwer, a Lord 'Shiva Temple' near Mula river surrounded by greenery.

कोतूळ आणि कोतुळेश्वराच्या निसर्गरम्य परिसराचा उल्लेख ब्रिटीशांनी नगर जिल्यातील 'महाबळेश्वर' या शब्दात सन्मानाने केला आहे. कोतुळेश्वराचा एकूणच परिसर, तेथील रमणीयता या सगळ्याची दखल घेऊन भोवतालच्या परिसरात सातत्याने भटकंती करणारे विख्यात साहित्यिक कै. गोपाल नीलकण्ठ तथा गो.नी.

दाण्डेकरांच्या आठवणी आणि इथल्या प्राचीन ठेव्याबद्दल माहितीपूर्ण भाष्य करणारे नागेश बोऱ्हाडे आणि भरत मोदी म्हणजे या ठिकाणचा कोशच समजले जात. नागेश बोऱ्हाडे अजूनही पुरातन ठेवा शब्दांतून उलगडताना हरवून जातात.

इथल्या भागातली काळी मैना अर्थात डोंगरची काळी मैना म्हणजे करवंदे आणि मोठाली आवळं हा रुचकर रानमेवा जिभेचा ठाव घेणारा. स्वातंत्र्यपूर्व काळात जंगल सत्याग्रहाच्या निमित्ताने ब्रिटीशांना आव्हान देणारा लढा देखील इथेच गाजला. 'नहीं रखनी, नहीं रखनी, ये जालिम सरकार नहीं रखनी' या घोषणेने गाजवलेला जंगल सत्याग्रहाचा आवेश (कै.) सहादूबाबा गिते मोठ्या ठेक्यात साभिनय करून दाखवत.

ऐतिहासिक कोतुळेश्वर, पौराणिक कोतुळेश्वर, निसर्गरम्य कोतुळेश्वर, कातळकाळ्या, महाकाय भव्य खडकांच्या साक्षीचे कोतुळेश्वर, भाविकांच्या भक्तीचे आधारस्त्रोत कातुळेश्वर, सहस्त्रधारांचे कोतूळेश्वर अशा एक ना दोन अनेक ओळखींनी साजलेले शिवालय कोतुळेश्वर मनात स्थान निर्माण करणारे. भुरळ पाडणारे. आत्मिक शांती प्रदान करणारे आहे.

* * *

## कथा महाराष्ट्राची, व्यथा महाराष्ट्राची?

कु. पल्लवी अशोक तांबे
(एम.ए.-१ 'मराठी')

एक होतं गाव महाराष्ट्र त्याचं नांव. गाव खूप छान होतं, लोक खूप चांगले होते. मराठी भाषा बोलत होते. गुण्यागोविंदानं नांदत होते त्याचं मन खूप मोठं होतं. वृत्ती खूप दयाळू होती. दुखलं-खुपलं तर एकमेकांच्या हाकेसरशी धावून जायचे. आल्या-गेल्याला सांभाळून घ्यायचे. एकमेकांना साथ देऊन जगण्याचं गाणं शिकवायचे ते सुरेल करायचे.

महाराष्ट्रात होता एक भाग, मुंबई त्याचं नांव. मुंबईसुद्धा छान होती. महाराष्ट्राची शान होती. सर्वांच्या आकर्षणाची बाब होती. आजूबाजूचे सगळेच मुंबईसाठी धडपडत होते. इथे आले की इथलेच होऊन राहत होते. 'अतिथी देवो भव!' या उक्तीनुसार महाराष्ट्रातील लोकांनी सर्वांचं आदरातिथ्य केलं. पाहुण्यांचा मान म्हणून मागतील ते देऊ लागले. हळूहळू परिस्थिती बदलू लागली. अतिथी जास्त आणि यजमान कमी झाले. मुंबई कमी पडू लागली, आजूबाजूला पसरु लागली. सगळ्यांची भाषा वेगवेगळी होती. मराठी आपली वाटत नव्हती प्रश्न मोठा गहन होता; पण माणसं मात्र हुशार होती. दूरदृष्टी होती. त्यांना एक युक्ती सूचली. दूरदेशीची परदेशातील भाषा त्यांना जवळची वाटली. त्यांना वाटलं आपली मुलं शिकतील, परदेशात जातील, उच्चशिक्षित होतील. सर्वांचाच,अगदी महाराष्ट्राचाही विकास होईल म्हणून त्यांनी याच भाषेतील शिक्षणाची सोय केली. आजूबाजूला या भाषेत बोलणारे पाहून मराठी माणसं खंतावली आपल्यालाही हे आलं पाहिजे. म्हणून याच भाषेत शिकू लागली. शिकवू लागली आणि मग हळूहळू मराठी कोणीच शिकेना, मराठी कोणीच बोलेना. बोलीभाषा बदलली. सगळ्यांचा नुसता काला झाला. शुद्ध सुंदर मराठीचा लोप झाला.

अशा या महाराष्ट्रातील एक छोटा मुलगा आईबरोबर - माफ करा हं - आपल्या मम्मीबरोबर एकदा वाचनालयात गेला चूकून त्याचा हात एका पुस्तकावर पडला. त्यानं ते उघडलं. पुस्तक शहारलं, पानं फडफडली, आनंदित झाली, त्यांना वाटलं चला निदान आज तरी आपल्याला कोणी वाचेल. इतक्यात त्या मुलानं विचारलं (त्याच्या भाषेत) ''कोणत्या भाषेतल पुस्तक आहे गं हे?'' मम्मी खूप सजग होती. पुस्तक परत जागेवर ठेवत म्हणाली '' अरे खूप पूर्वी म्हणजे तुझ्या आजोबांच्या वेळेस मराठी भाषा प्रचलित होती; आता नाही कोणी ती बोलत.''

पुस्तक कोमेजलं, पानं आक्रसली, पानापानातून अश्रू ठिबकले; पण हळहळ वाटण्याचं काही कारण नव्हतं कारण आता मराठीसाठी दु:खी होणारं काळीज कोणाचच उरलं नव्हतं.

* * *

# सर्प वाचवा, निसर्ग वाचवा !

## Save Snake, Save Environment !

**प्रदिप देशमुख** (टी.वाय.बी.एस्सी. 'केमेस्ट्री')
**विरेंद्र मेढे** (एम.ए. 'राज्यशास्त्र')

साप ! म्हणजे जमिनीवर चालणारा आणि विशिष्ट चाल असणारा प्राणी. सापाचा जमिनीवर सरपटण्याचा वेग हा ताशी ३ कि.मी. असतो आणि अधिकतम वेग हा ताशी ६ कि.मी असतो. सापांमध्ये सर्वात वेगवान साप म्हणून ओळखला जातो तो दक्षिण आफ्रिकेतील ब्लॅक मोबा.

ब्लॅक मोबा या सापाचा ताशी वेग २० किमी. इतका असतो.

भारतामध्ये २७८ जातींचे साप आढळतात तर महाराष्ट्रामध्ये ४७ जातींचे साप आढळतात आणि अकोले तालुक्यामध्ये जवळ जवळ २२ जातींचे साप आढळतात, भारतात आढळणाऱ्या सापांमध्ये फक्त ५ जाती विषारी आहेत. १) नाग, २) मण्यार, ३) घोणस, ४) फुरसे, ५) चापडा

भारतात आढळणाऱ्या सापांमध्ये वाळा हा सर्वात लहान किंवा कमी लांबीचा साप म्हणून ओळखला जातो. या सापाची लांबी २० से.मी. इतकी होऊ शकते. या उलट अजगर हा भारतात आढळणाऱ्या सापांमध्ये सर्वात मोठा किंवा लांब होणारा साप म्हणून ओळखला जातो. याची लांबी जास्तीत जास्त ३६ फुट म्हणजे ११ मिटर इतकी होऊ शकते.

सापांवर एखादे संकट आल्यास ते पळून जाणे पसंत करतात आणि पळून जाणे शक्य नसेल तर एक विशिष्ट प्रकारची धोक्याची सूचना देतात. उदा. नाग हा आपला फणा उभारतो आणि फुत्कारतो, ही एक धोक्याची सूचना असते. घोणस हा प्रेशर कुकरच्या शिट्टी प्रमाणे आवाज करतो आणि फुरसे हा आपली खवले एकमेकांवर घासून करवतीने लाकुड कापल्यासारखा आवाज करतो आणि धोक्याची सूचना देतो, ह्या सूचना जर आपण काटेकोरपणे पाळल्या तर आपण विषारी सापांपासून आपला जीव वाचवू शकतो.

सापांना एर्लींहशीरी असे संबोधले जाते. एर्लीं म्हणजे बाह्य आणि ढहशीर म्हणजे उष्णता. बाहेरील उष्णतेवर जीवंत राहणारे प्राणी म्हणून सापांची ओळख आहे. जीवंत राहाण्यासाठी साप अन्नाचा (Food energy) उपयोग करत नाहीत. एक भारतीय जाळीदार अजगर (Indian Rock Python) दोन वर्षे नऊ महिने इतका कालावधी उपाशी राहिलेला आहे, अशी नोंद चेन्नईच्या कान्हा नॅशनल पार्कमध्ये झालेली आहे. साप त्यांच्या अंगावरील खवले एकमेकांवर घासून त्यातून उष्णता निर्माण करतात आणि त्यावर जिवंत राहतात.

साप हे शीतरक्तीय असतात (Cold blooded) आणि ते थंड ठिकाणी राहणेच पसंत करतात. ८ल% पेक्षा कमी आणि ४५ल पेक्षा जास्त तापमान सापांसाठी प्राणघातक ठरू शकते. याऊलट मनुष्य हा उष्णरक्तीय असतो. (Warm Blooded). सापांना यमदुत किंवा यमराज अशी नावे दिली गेलीत कारण आपण असं समजतो साप आपल्याला चावतात आणि आपला मृत्यु होतो मग या सापांना जिवंत ठेऊन काय फायदा ?

उंदीर हे सापाचे प्रमुख अन्न आहे. उंदराची उत्पत्ती खूप प्रचंड असते. एक उंदराची जोडी एका वर्षात जवळ-जवळ ८८८ पिल्ले जन्माला घालू शकते. फक्त एक उंदीर एका वर्षात ८ किलो अन्न फस्त करतो. त्यातील ४ किलो अन्न तो स्वतः खातो आणि ४ किलो धान्याची नासाडी करतो. तर या उंदरांना संपवण्याच काम हे साप करत असतात. एक धामण साप दिवसाला ७ ते ८ उंदीर फस्त करत असतो. परंतु आपण असे साप कुठे दिसले की लगेच त्यांना मृत्युदंड देतो. सापांपासून असलेला महत्त्वाचा फायदा म्हणजे सापांच्या विषापासून वेगवेगळ्या आजारांवरची औषधी बनवली जातात.

जर कुणाला सर्पदंश झाला तर त्या व्यक्तीचा जीव हा प्रतीसर्पविष लस देऊनच वाचवला जाऊ शकतो. इतर कुठल्याही प्रकारे साचाचे विष शरीरातून बाहेर काढता येत नाही किंवा नष्ट करता येत नाही. प्रतीसर्पविष लस ही फक्त सापांच्या विषापासूनच बनवता येते.

सापांना मृत्युदंड देण्याचा हक्क कुणालाही नसतो. निसर्गामध्ये सर्वांना राहाण्याचा हक्क आहे. साप कधीही आपल्याला चावण्यासाठी आपल्याजवळ येत नसतात. त्यामुळे सर्प वाचवा आणि निसर्ग वाचवा!

सर्पदंशाची लक्षणे :

१) नाग (Spectacted Cobra) : नागाचे दंश केल्यास दंश झालेल्या जागी दोन दात ओरखडलेले असतात, त्या ठिकाणची त्वचा काळी पडते, सुज येते, जीभ राठ होते व मनुष्य बोबडे बोलायला लागतो व काही प्रमाणात दातखिळी पण बसु शकते.

२) मण्यार (Common Crait) : मण्यार ह्या सापाला डळश्रशपीं ज्ञळश्रश्रशी असे म्हटले जाते, या सापाच्या दंशाची लक्षणे ६-७ तासांनंतर दिसायला लागतात, दंश झालेल्या जागी सुज येत नाही किंवा जळजळ होत नाही. परंतु सांध्यांमध्ये तीव्र वेदना चालू होतात व डोळ्यासमोर काळोख पसरतो.

३) घोणस (Russel's Viper) : घोणस या सापाने दंश केल्यास दंश झालेल्या ठिकाणी तीव्र वेदना चालु होतात दोन दात ओरखडलेले दिसतात. शरीरावर सुज येते आणि नाकावाटे, तोंडातून, डोळ्यातून व लघवीवाटे रक्त वाहते.

४) फुरसे : फुरसे या सापाचे विष घोणस पेक्षा ८ पटीने जास्त तीव्र असते. दंशाच्या ठिकाणी दोन दात ओरखडलेले दिसतात. तीव्र वेदना व जळजळ त्या ठिकाणी होत असते आणि शरीरात रक्त गोठायला लागते.

५) चापडा : चापडा सापाच्या दंशामुळे होणाऱ्या मृत्युचे प्रमाण खूप कमी आहे. कारण इतर विषारी सापांपेक्षा या सापाचे विष कमी घातक असते.

दंश झालेल्या जागी दात ओरखडल्याची निशाणी असते. थोडीशी जळजळ व सुज त्याठिकाणी होऊ शकते.

प्रथमोपचार :

आपल्याकडे एक जुनी पद्धत आहे, साप चावला की ब्लेडने काप घेणे. परंतु अशाप्रकारे काप घेणे ही बाब रुग्णासाठी खूप वेदनादायक असते व त्यामुळे शरीरातील बहुमुल्य रक्त खुप जास्त प्रमाणात वाहुन जाते. बहुदा चावलेला साप हा बिनविषारी असतो परंतु अज्ञानापोटी लोक ब्लेडने वार करतात आणि बहुतेक वेळी रुग्ण दगावतो, त्यामुळे सर्पदंश झाल्यावर कुठल्याही प्रकारे शरीरावर वार करू नयेत.

१) ज्या ठिकाणी सर्पदंश झालाय ती जागा थंड व स्वच्छ पाण्याने धुवून घ्यावी.

२) नाग किंवा मण्यार या सापांचा दंश झालेला असेल तर कापडी पट्टी दंश झालेल्या जागेपासून ठरावीक अंतरावर बांधावी, जेणेकरून सापाचे विष आपल्या मेंदुपर्यंत पोहोचायला वेळ लागेल व जीव वाचण्याची शक्यता पण वाढेल.

पट्टी बांधताना विशेष काळजी घ्यावी, ती पट्टी जास्त घट्ट बांधु नये असे केल्यास सापाचे विष पुर्णपणे एकाच जागेवर थांबेल व तो अवयव निकामी होण्याची शक्यता वाढेल.

३) फक्त नाग आणि मण्यार या सापांचा दंश झाल्यासच पट्टी बांधावी. घोणस, फुरसे अथवा चापडा असे साप चावल्यास पट्टी बांधु नये, फक्त जखम स्वच्छ पाण्याने धुवावी व तातडीने औषध उपचार करावे.

४) सर्पदंश झालेल्या व्यक्तीला विशिष्ट अशा प्रकारे मानसिक धीर देणे खूप गरजेचे असते. त्या व्यक्तीस कुठल्याही प्रकारे धावपळ देऊ नये.

५) बरेच वेळेस चावलेला साप हा बिनविषारी असु शकतो. ज्या वेळी सर्पदंशाच्या ठिकाणी दोनपेक्षा जास्त जागेवरुन रक्तस्त्राव होत असेल आणि त्या ठिकाणी कुठलीही जळजळ किंवा सुज नसेल तर चावलेला साप हा बिनविषारी असु शकतो.

सर्पांविषयी गैरसमज :

१) साप दूध पितो : साप हा सस्तन प्राणी नसुन दूध हे सस्तन प्राण्यांचे अन्न आहे. दूध पिल्याने सर्पांचा उष्माघाताने अथवा दोन-तीन महिण्यांच्या कालावधीत निमोनिया होवून मृत्यु होतो.

२) साप डक/लक्ष ठेवतो : सापांची स्मरणशक्ती ही अतियश अल्पावधीची असते. ते कोणतीही गोष्ट जास्त वेळ लक्षात ठेवू शकत नाही.

३) सापांच्या अंगावर केस : सापांच्या अंगावर कोणत्याही प्रकारचे केस उगवत नाहीत. केस हा प्रामुख्याने सस्तन प्राण्याचे लक्षण आहे.

४) नागमणि : नाग/नागीणीजवळ कोणत्याही प्रकारचा

नागमणी नसतो. आपल्याकडे गारुडी अथवा भोंदु बाबालोक याचा गैरफायदा घेऊन बेंझाईन धातुचे खडे नागमणी म्हणून विकतात व पैसे उकळतात.

५) सर्पदंशविरोधी मंत्र : कोणत्याही देव-दैत्य व मांत्रिक यांच्या सहाय्याने विष उतरविता येत नाही अथवा नष्ट करता येणार नाही. विषाचे प्रमाण हे औषध व वैज्ञानिक उपचाराने कमी करणे शक्य आहे. परंतु नष्ट करता येत नाही. यावर एकच उपाय आहे ती म्हणजे प्रतिसर्प विषलस.

मांडूळ :

१) मांडूळ सर्पाला २ तोंड असतात : मांडुळ सापाला कुठल्याही प्रकारची दोन तोंडे नसतात. या सापाला देवाने दिलेली देणगी आहे. याचे तोंड व शेपटी दिसायला सारखीच असते. ज्यावेळी या सापावर संकट येते त्यावेळी तो आपले तोंड मातीत घालून शेपटी वर करून हालवतो.

२) मांडूळ साप चावल्यास माणूस सडून मरतो : मांडूळ सापाच्या तोंडात कोणत्याही प्रकारचे विषदंत नसतात. फक्त बिनविषारी दात असतात. त्यामुळे या सापापासून कुठल्याही प्रकारचा धोका नसतो.

७) धामण : धामण हा साप तोंडात शेपटी पकडून रिंग बनवतो. असे प्रत्यक्षात कधीही घडत नाही. धामण साप चावल्यास मनुष्य नपुंसक बनतो. हाही गैरसमज आहे. धामण सापाच्या तोंडात कुठल्याही प्रकारचे विषदंत नसतात. त्यामुळे यापासून कोणत्याही प्रकारचा धोका होत नाही. धामण गाईच्या व म्हशीच्या पायाला वेढा घालून दूध पितो, हा देखील गैरसमज आहे.

८) हरणटोळ जातीचा साप टाळू फोडतो : हरणटोळ हा साप शक्यता झाडावर राहतो. झाडाखालून चालल्यावर हा साप डोक्यावरच्या भागाला चावतो. म्हणून असा गैरसमज आहे की हरणटोळ जातीचा साप टाळू फोडतो. आपल्या डोक्यावरील हाड खूप मजबूत असते. त्यासाठी डॉक्टरला ऑपरेशन करताना छणी व हातोडीचा वापर करावा लागतो. हरणटोळ जातीच्या सापाचे तोंड खूप नाजूक असते. त्यामुळे आपल्या डोक्याचा टाळू फोडू शकत नाही.

९) साप चावलेल्या जागी कोंबडीचे गुदद्वार लावतात : कोंबडीचे गुदद्वार हे आकुंचन व प्रसरण पावते. त्यामुळे असा गैरसमज आहे की विष उतरते पण याला कोणताही शास्त्रीय आधार नाही.

* साप चावल्यावर मिरची खायला देतात. : ज्यावेळी साप चावतो त्यावेळी जिभ राठ होते व कुठलीही चव कळत नाही.

१०) नर नाग व मादी धामण यांचे मिलन होते : साप फक्त स्वजातीतच मिलन करतात.

११) साप जेव्हा उलटा होतो त्यावेळी विष शरीरात टोचले जाते : सापाच्या तोंडामध्ये आतल्या बाजूने वाकलेले दात असतात. ज्यावेळी साप आपल्या शरीरात दात टोचतो त्यावेळी तो दात बाहेर काढण्यासाठी धडपड करतो व उलटा होतो.

* अकोले तालुक्यात आढळणारे साप –

बिनविषारी (Non Poisonous) :

१. वाळा (Warmsnake)
२. मांडूळ (earthoboa)
३. डुरक्या घोणस (Warmsnake)
४. धामण (Indian ratsnake)
५. तस्कर (Common trincket snake)
६. कुकरी (Kukri snakr)
७. रुखास (Broznback treesnake)
८. गवत्या (Green keelback)
९. दिवड (Checkered keelback)
१०. नानेरी (Striped keelback)
११. धूळनागीण (Banded racer)
१२. चित्रांगनायकुळ (slender racer)
१३. कवड्या (Common wolf snake)
१४. खापरखवल्या (Phisson sheild tait)
१५. अजगर (Indian rock python)

निमविषारी (Semi Poisonous) :

०१. हरणटोळ (Vinesnake)
०२. मांजऱ्या साप (Common cat snake)

विषारी (Poisonous) :

०१. मण्यार (Common Crait)
०२. नाग (Spectaled Cobra)
०३. घोणस (Russel's Viper)
०४. फुरसे (Saw Scaled Viper)
०५. चापड (Bambopit Viper)

* * *

# शहीद सचिन माने

विकास कुमकर, ज्ञानेश्वर माने
( एस.वाय.बी.ए. )



मरावे परी कीर्तिरूपे उरावे ।

माझ्या भारतभूमीवर भारतभूमीच्या रक्षणासाठी दिनांक २६ मे १९९१ रोजी ईश्वराने सचिनला माने कुटुंबात जन्म दिला. आपल्याच अकोल्यातील तांभोळ या गावातील भरत कारभारी माने यांचा तो धाकटा मुलगा . सचिनचे १ ली ते ७ वी पर्यंतचे शिक्षण प्राथमिक शाळा तांभोळ या ठिकाणी झाले. ८ वी ते १० वी पर्यंत तुळजाभवानी माध्यमिक विद्यालय तांभोळ येथे, तर सांगण्यास अभिमान वाटतो की, ११ वी व १२ वी चे शिक्षण अगस्ति महविद्यालयात झाले, १२ वी नंतर लगेच ('बीएसएफ') (५८ 'बीएन') मध्ये तो भरती झाला.

सचिनला पहिल्यापासून देशप्रेमाची आवड होती. तो शाळेत हुशार, शिस्तप्रिय आणि अभ्यासात सतत मग्न असे, अशीच देशसेवा करत असताना आसामच्या धरतीवर दिनाक ५ जून २०१३ रोजी या वीराला वीरमरण आले. सचिनसारखा हुशार गुणवंत विद्यार्थी इथेही नोकरी प्राप्त करू शकला असता, परंतु त्याचा ध्यास एकच होता. 'देशसेवा'. या सचिनने अगस्ति महाविद्यालयाची मान उंचावली, तांभोळ सारख्या एका लहानश्या गावाचे नाव रोशन केले. अकोले तालुक्याचे अहमदनगर जिल्ह्याचे नाव खूप उंच शिखरावरती पोहचवले. या महान वीराला अभिवादन करतो, सलाम करतो. अगस्ति महाविद्यालयाच्या वतीने भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो.

"जे देशासाठी लढले
ते अमर हुतात्मे झाले!"

# महाविद्यालयातील विद्यार्थी मंडळाच्या निवडणूका मुक्त व्हाव्यात का?

आव्हाड राहुल शरद
( टी.वाय.बी.ए., इंग्लिश )

दरवर्षी महाविद्यालयातील विद्यार्थी मंडळाच्या निवडणूका होतात. विद्यापीठ प्रतिनिधींच्या निवडीसाठी, मात्र त्याच मतदानांसाठी फक्त वर्गप्रतिनिधींची निवड केली जाते. वर्गात असणाऱ्या इतर विद्यार्थ्यांच्या मताचा विचारच केला जात नाही. वर्ग प्रतिनिधी म्हणजे गुणवंत असा विद्यार्थी. मात्र हुशार असणाऱ्या विद्यार्थ्यांच्या अंगी संघटन कौशल्य, प्रगल्भ विचार क्षमता, निर्णयक्षमता, समस्या सोडविण्याची हतोटी इत्यादी गुण अभावानेच आढळतात. वर्गात इतर विद्यार्थिही असतात. मात्र त्यांच्या मताचा विचार येथे केला जातो का? किमान अक्षर ओळख असणाऱ्यांना मतदानाचा अधिकार असावा ''असा थॉमस हिलग्रीन'' हा विचारवंत आपले विचार मांडतो. मात्र महाविद्यालयात विद्यापीठीय शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना मतदानापासून अलिप्त ठेवले जाते.

राजकीय लोकशिक्षण व्हावे अशी बऱ्याचदा चर्चा ऐकायला येते. राजकीय लोकशिक्षण होण्यासाठी राज्यशास्त्राच्या पुस्तकाची पाने उकळून पिले तरी उपयोग होणार नाही. कारण त्यासाठी त्या प्रक्रियेची अनुभूती हवी.

प्रत्यक्ष अनुभवासाठी महाविद्यालय म्हणजे निवडणूकीचा आखाडा नाही असाही युक्तिवाद केला जातो. मात्र सध्याच्या राजकीय आखाड्यातील माहिती कुठे एका रंगाची आहे. त्यात सुधारणा अपेक्षित असेल तर त्याची सुरुवात इथूनच व्हायला हवी.

ग्रामपंचायत, जिल्हापरिषद ते लोकसभेपर्यंत मतदारांचा वयोगट १८ वर्षे हा भारतीय घटनेचा नियम येथे मात्र लागू केला नाही. इतर राजकीय स्तरावर आपण 'एक व्यक्ती-एक मत' 'एक मत-एक मूल्य' असा विचार करतो, मात्र महाविद्यालयीन निवडणूकीत एका व्यक्तिच्या एका मताला अनेकांचे मूल्य का? जी शैक्षणिक प्रक्रिया, जो वयोगट भावी नागरिक निर्माण करतो तिच प्रक्रिया इतकी खुळचट का?

महाविद्यालयीन विद्यार्थी-मंडळाच्या निवडणूकीत गैरप्रकार होतो. अपहरण, मारामाऱ्या, पैसे वाटणे इ. मात्र आपण एक विचार करुयात. जर मतदारांची संख्या अधिक असेल तर अपहरणाचे प्रमाण कमी होईल. एव्हाना होणारच नाही. कारण कोणा-कोणाचे अपहरण करणार आणि कोणा-कोणाला पैसा वाटणार असाही प्रश्न आहेच?

महाविद्यालयीन विद्यार्थी मंडळाच्या निवडणूकांत समान संधीवर आणि स्वातंत्र्यावर मर्यादा येतातच. मित्रांनो आज मतदारांची संख्या कमी होत आहे. मतदान केंद्राबाहेर मतदान करणाऱ्यांची अनास्था स्पष्ट दिसत आहे. जर समाजाच्या आधुनिकीकरणाचा मार्ग राजकीय अंत:करणातून जात असल्यास त्यासाठी वाढणाऱ्या जागरुक मतदारांचा पुरवठा महाविद्यालयीन विद्यार्थी मंडळाच्या मुक्त निवडणूकांमधूनच शक्य होईल.

राजकारणाला अधिमान्यता मिळवून देणारा शिक्षण हा सांस्कृतिक घटक आहे. त्याच घटकातून राजकीय नेतृत्व आणि सुज्ञता घडवायची असल्यास महाविद्यालयीन निवडणूक प्रक्रियेतील बदल आवश्यकच आहेत.

टी.एस. एलियट, स्टुअर्ट मिल, ॲरिस्टॉटल, रुसो, सॉक्रेटीस, प्लेटो, थॉमस हीलग्रीन ह्या सर्व राजकीय विचारवंताचे विचार एकच सांगतात - राजकीय व्यवस्था टिकविण्यासाठी राजकीय शिक्षण महत्त्वाचे आहे आणि ते घडण्यासाठी महाविद्यालयीन निवडणूका आपली महत्त्वाची भूमिका पार पाडतील.

लोकशाही टिकवून धरण्यात ज्यांना रुची आहे अशा सर्वांकरिता जॉन स्टुअर्ट मिलने जो इशारा दिला तो आपण लक्षात घेतला पाहिजे. तो असे म्हणतो अगदी थोर माणसाच्या चरणावर देखील आपले स्वातंत्र्य अर्पण करू नका, अथवा आपल्या संस्था उलथून पाडणे त्याला शक्य होईल इतकी सत्ता त्याच्या हाती सोपविण्याइतका विश्वास त्याच्यावर ठेवू नका, आम्ही मात्र आमच्या वर्गप्रतिनिधींच्या हाती मतदानाची सत्ता सोपवितो. आम्हाला हे कितपत संयुक्तिक वाटतं?

आणि काय करतो विद्यार्थी प्रतिनिधी त्याच्या एका वर्षाच्या कालखंडात हा ही एक वैचारिक प्रश्न आहे. तो खरच सगळ्यांचा प्रतिनिधी असतो की फक्त वर्ग प्रतिनिधींनी निवडून दिलेला आणि पद भूषविणारा व्यक्ती, की जो काहींच्याच मान्यतेने तिथपर्यंत पोहचलेला असतो. आमच्या वर्गप्रतिनिधींचे मत म्हणजे सर्व विद्यार्थ्यांचे मत या संकुचित भावनेने. म्हणून आम्हाला आता विचार करण्याची गरज आहे आणि तितकीच गरज आहे महाविद्यालयातील विद्यार्थी मंडळाच्या निवडणूक प्रक्रियेत बदल घडविण्याची असाही एकदा विचार करूयात स्वत:साठी.

* * *

# दुर्गा भागवत यांच्या ललितगद्य लेखनातून व्यक्त होणारे स्वतंत्र विचार

प्रा.डॉ. रंजना कदम
(मराठी विभाग प्रमुख)

प्रस्तावना : दुर्गा भागवत ह्या मराठी साहित्यातील प्रथितयश, चिकित्सक लेखिका आहेत. त्यांनी आपल्या लेखनातून स्वतःचे असे महत्त्वपूर्ण स्थान निर्माण केले आहे. त्यांनी विविध प्रकारचे भरपूर लेखन केले आहे. त्यांचे लेखन वाचताना बौद्धिक आनंद तर मिळतोच पण कलात्मक आनंदही वाचक मनसोक्त उपभोगतो. त्यांचा अफाट व्यासंग, तीव्र स्मरणशक्ती, अनुभवांची संपन्नता, सौंदर्यदृष्टी, रसिकता, जीवनाकडे पाहण्याचा व्यापक, सकारात्मक दृष्टिकोन, थक्क करणारी कल्पनाशक्ती, विचार करायला भाग पाडणारी चिंतनशीलता, सूक्ष्म निरीक्षण, मानवी स्वभावाची सखोल जाण, अभ्यासू संशोधनात्मक वृत्ती, ठामपणा, आत्मविश्वास, जिज्ञासूपणा, कठोर परिश्रम यांमुळे यांचे लेखन वाचताना वाचक थक्क होऊन जातो. त्यांचे लेखन वाचकाला निसर्गाकडे, समाजाकडे पाहण्याची निर्मळ, व्यापक, कलात्मक दृष्टी देते.

दुर्गाबाईंनी ललितगद्यावर पुस्तके लिहिली आहेत. त्यात 'ऋतुचक्र' १९५६ 'भावमुद्रा' १९६०, 'व्यासपर्व' १९६२, 'पैस' १९७०, 'डूब' १९७० , 'प्रासंगिका' १९७५, 'आठवले तसे' १९९१, 'दुपानी' १९९५, 'निसर्गोत्सव' १९९६, 'लहानी' या पुस्तकांचा समावेश होतो. या लेखनातून त्यांची स्वतंत्र विचारशीलता कशी प्रकट होते. याचा थोडक्यात आढावा घेऊ.

निसर्गविषयक विचार : निसर्ग हा दुर्गाबाईंचा आवडीचा आणि कुतूहलाचा विषय होता. निसर्गातील सौंदर्य त्यांच्या मनाला भुरळ घालत असे. हे सौंदर्य न्याहाळण्यात त्या रमून जात. यावेळी त्यांची कल्पनाशक्ती मनसोक्त विहार करत असे. निसर्ग आणि माणूस यांच्यातील अतूट नाते त्यांनी उलगडून दाखविले आहे. निसर्गवर्णनातून त्यांच्या मुक्त विचारांचे कसे दर्शन घडते ते पाहू. 'ऋतू म्हणजे फिरता काल, समस्त सृष्टीला कवटाळणारा, हरघटकेला तिला हसवणारा, तिला रडवणारा, नटवणारा आणि तिचा सगळा नखरा साजश्रृंगार हातांनी ओढून काढून तिला उन्हात तापवणारा, वाऱ्यात सुकवणारा, भिजवणारा कालाचा अगदी लहान अंश म्हणजेच ऋतु' म्हणजेच ऋतुंविषयी दुर्गाबाईंनी अगदी बारकाईने, अभ्यासपूर्ण विचार केला आहे.

सामाजिक चिंतन : दुर्गाबाई या चिंतनशील लेखिका होत्या. त्या समाजाकडे डोळसपणे पाहत असत, त्यामुळे समाजातील अनेक प्रश्न त्यांना अस्वस्थ करत. त्या प्रश्नांवर दुर्गाबाई गांभीर्याने विचार करून त्यामागील कारणांचा अभ्यासपूर्ण वेध घेत असते. त्यांचे विचार वाचकाला अंतर्मुख करतात. विचार करायला भाग पाडतात. वाचकाची संवेदनशीलता जागृत करुन त्याला समाजाकडे पाहण्याची व्यापक दृष्टी देतात. दुर्गाबाईंच्या लेखनातून सामाजिक चिंतनशीलतेचे कसे दर्शन घडते ते पाहू. अनेक माणसांचे वागणे दुटप्पी असते. बऱ्याचदा आपल्या खऱ्या चेहऱ्यावर त्यांनी मुखवटे चढवलेले असतात. त्यामुळे ढोंगीपणाचे वर्तन करत असतात. दुर्गाबाईंना समाजाची दिशाभूल करणाऱ्या, फसवणाऱ्या माणसांची चीड येत असे. म्हणून त्या लिहितात, ''आम्ही चेहरा हा चेहरा ठेवीत नाही. त्याचा मुखवटा बनवतो. लोकांच्या प्रेरणांप्रमाणे चलाख होऊन तो घडवतो आणि मग तो चढवूनच वापरतो. तो मग इतका घट्ट बसतो की खरा चेहरा कधी दिसतच नाही.'' म्हणजेच अनेक माणसे ढोंगीपणाने वागतात व समाजाची फसवणूक करतात. त्यांच्या नाटकी वागण्याचा दुर्गाबाईंना खूप राग येतो.

स्त्रीविषयक चिंतनशीलता : आपल्या देशात पुरुष प्रधान संस्कृती असल्याने स्त्रीला दुय्यम स्थान दिले जाते. तिच्यावर विविध प्रकारची बंधने लादली जातात. त्यामुळे तिला जीवनाचा मनसोक्त उपभोग घेता येत नाही. स्वतंत्ररित्या कोणत्याही गोष्टींचा निर्णय घेता येत नसल्याने पुरुषांच्या मर्जीनुसार तिला आपले जीवन जगावे लागते. अनेक पुरुष स्त्रीकडे केवळ अधिकार गाजवण्याची वस्तू म्हणून पाहतात.

बऱ्याचदा गरीब स्त्रियांवर अत्याचार केले जातात. बऱ्याच घरांमध्ये स्त्रियांच्या कष्टांना किंमत दिली जात नाही. तिच्या कामाची आणि तिच्या भावनांची कदर केली जात नाही. तिच्या कामाचे मोल कुणालाच नसल्याने ती नाराज होते. तिला कामाचे काहीच वाटत नाही. तिला फक्त दोन शब्द प्रेमाचे हवे असतात. पण तेही तिला कोणाकडून ऐकायला मिळत नाही. म्हणजेच तिला सर्व भावना दडपून टाकाव्या लागतात. अशाच एका स्त्रीविषयी म्हणजेच हरिभाऊ या प्रतिष्ठित व्यक्तीच्या बायकोविषयी दुर्गाबाई लिहितात, ''त्यांचा त्याग, घराण्याबद्दल रास्त अभिमान आणि दयाभाव हा असा होता. अशा या प्रेमळ, उदार स्त्रीला पती, नणंदा, कुणाकडूनच प्रेम मिळू नये ही केवढी शोकांतिका !''म्हणजेच गृहिणींना तिच्या घरात आदराने, प्रेमाने, मान–सन्मानाने जगता आले तरच ती आनंदाने, सुखाने व उत्साहाने जीवनाचा उपभोग घेऊ शकेल.

<u>धार्मिक चिंतनशीलता</u> : दुर्गाबाई सर्वच धर्मांकडे समदृष्टीने बघत. धर्माबद्दल त्यांच्या मनात श्रेष्ठ–कनिष्ठ हा भेद नव्हता. त्या इतर धर्मांकडे पूर्वग्रहदूषित नजरेने पाहत नसत. तर इतर धर्मांबद्दल त्यांच्या मनात आदराची भावना होती. धर्मांविषयी त्यांची निर्विकार दृष्टी पुढील वाक्यातून स्पष्ट होते. ''कुठल्याही कबरीला, थडग्याला किंवा समाधीला ऐतिहासिक अगर आधुनिक, मी भेट देते तेव्हा ते मृताचे मानसिक दर्शन म्हणूनच घेते. तिथे राजकीय भेदभाव, दुष्ट–सृष्ट किंवा ऐतिहासिक घटना आड येत नाहीत.'' म्हणजेच दुर्गाबाई सर्व धर्मांकडे सारख्या वृत्तीने पाहत.

<u>साहित्यविषयक चिंतन</u> : दुर्गाबाई एक जबाबदार लेखिका म्हणून वावरत असत. साहित्याविषयीची आपली अभ्यासपूर्ण मते त्यांनी सातत्याने व्यक्त केलेली आहेत. साहित्य हा समाजाचा महत्त्वाचा आधारस्तंभ आहे. त्यामुळे साहित्यिकाने जबाबदारीचे भान गांभीर्याने ठेवलेच पाहिजे. असे त्यांचे ठाम मत होते. साहित्यिकांकडे व साहित्याकडे दुर्गाबाई आदराने पाहत असत. गणेश रंगो भिडे यांनी अनेक दुय्यम कोश निर्माण केले. त्यांची दुय्यम कोश रचनेची कामगिरी खूप महत्त्वाची आहे. कारण छोट्या कोशांमुळे मोठ्या कोशाला आत्मसात करण्याची कुवत लोकांमध्ये येते. परंतु सरकार अशा कोशांना भरभरुन मदत देत नाही. या विषयीची खंत त्या व्यक्त करतात. आणि सरकारच्या हलगर्जीपणावर परखडपणे टीका करतात. लेखनाविषयीचे आपले विचार व्यक्त करताना त्या म्हणतात, ''लेखन ही कला आहे. एक जबरदस्त मोहिनी आहे, ही गोष्ट खरी. जन्मापासून ज्याला कलेचा छंद आहे तोच कलावंताचा पेशा उचलतो. लेखनाचेही तसेच आहे. कुठलाही लहान मोठा लेखक, लेखक का होतो? कारण त्याला लिहिणे आवडते.'' लेखनाला समाजात खूप मोलाचे स्थान असते. लेखकाने याची जाणीव ठेवणे महत्त्वाचे आहे. लेखन समाजाला घडवत असते. दिशा देत असते. त्यामुळे लेखकाने गांभीर्याने बारकाईने विचार करून, अभ्यासपूर्ण लेखन केले पाहिजे. प्रत्येक लेखकाने, अभ्यासकाने आपली कुवत अंतिम सीमारेषेपर्यंत ताणली पाहिजे.

<u>सांस्कृतिक चिंतनशीलता</u> : दुर्गाबाईंना आपल्या संस्कृतिचा रास्त अभिमान आहे. अनेक माणसे आपल्या संस्कृतिचा अभ्यास न करता, तिचे महत्त्व जाणून न घेता, इतरांचे केवळ अंधानुकरण करून, आपल्या संस्कृतिला कमी लेखतात. दुर्गाबाईंना अशा माणसांचा राग येतो. त्यांनी आपल्या संस्कृतिचे महत्त्व अभ्यासपूर्णरित्या, विचारपूर्वक समजून घेतले आहे. तेच त्यांनी आपल्या लेखनातून पटवून देण्याचा प्रयत्न केला आहे. भारतीय सन आणि निसर्गसृष्टी यांचा मेळ कसा सौंदर्यपूर्णरित्या घातला आहे. हे दाखवून देताना, भाद्रपद महिन्यातील गौरी गणपतीचा सन आणि निसर्ग यांचे अतूट नाते उलगडून दाखविले आहे. दुर्गाबाई लिहितात. ''ओल्या धरित्रीचा किंवा मातीचा गोळा करून त्याचा गणपती करावा. तेरड्यांच्या किंवा खड्यांच्या गौरी कराव्या आणि सारी पाने फुले त्यांना अर्पण करावी. हा भारतीय विधी म्हणजे निसर्गाच्याच या विविध आविष्कारांचे रुपक नाही तर काय?'' भारतीय सण–उत्सव व निसर्ग यांचे किती अतूट नाते आहे, याचे सौंदर्यपूर्ण मनोवेधक वर्णन दुर्गाबाईंनी केले आहे.

<u>भाषाविषक चिंतन</u> : मराठी भाषेच्या अस्तित्वाविषयी मराठी माणसाला चिंता वाटते. मात्र मराठी माणूस, मराठी भाषा टिकवण्यासाठी, तिचे सामर्थ्य, दर्जा वाढविण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करत नाही. उलट तो भाषेचा बेजबाबदारपणे वापर करतो. मराठी भाषेच्या उत्कर्षासाठी तो झटताना दिसत नाही. याची दुर्गाबाईंना खंत वाटते.

मराठी भाषिक आपल्या उच्चारणाकडे जाणिवपूर्वक लक्ष देत नाही. याविषयी दुर्गाबाई लिहितात, ''आकाशवाणी, शिक्षणसंस्था, नाट्यसंस्था व राजकीय संस्था या साऱ्यांना 'नेटके बोलणे' आत्मसात करणे अत्यंत आवश्यक असते.'' मराठी बोलणे कानांना सुलभ कसे लागेल ही चिंता सार्वजनिक भाषण करणाऱ्या प्रत्येकाला वाटली पाहिजे. याचा ध्यास सुरक्षितांना लागल्याशिवाय आपल्या भाषेचे बोलत्यावेळचे रटाळपण नाहीसे होणार नाही. मराठी भाषा शुद्ध बोलल्यास ती अर्थवती होते. तिच्यात माधुर्य येते. असे भाषाविषयक अनेक विचार त्यांच्या लेखनातून प्रकट झाले आहेत.

<u>राजकीय चिंतन</u> : दुर्गाबाईंनी प्रत्यक्ष राजकारणात कधी भाग घेतला नाही. पण जबाबदार नागरिक म्हणून सरकारी निर्णयांवर, राजकारणातील अनागोंदी कारभारावर त्यांनी वारंवार आपल्या प्रतिक्रिया व्यक्त केलेल्या आहेत. दुर्गाबाईंना खोटेपणाची, फसवेगिरीची, सरकारच्या बेजबाबदार वागण्याची, स्वार्थी वृत्तीची खूप चीड होती. त्यामुळे त्या आपली मते परखडपणे व्यक्त करत. राजकारणाविषयी बोलताना त्या लिहितात, ''आज राजकारणात जो स्वार्थ उघड दिसतो त्याची सारी बीजे गांधीजींच्या चळवळीच्या भरभराटीच्या काळातही तशीच उठून दिसू लागली. वैयक्तिक हेवेदावे, स्वतःच्या फायद्यासाठी काय वाटेल ते करणे.'' म्हणजेच आजच्या राजकारणातील दोष गांधी युगातही दिसतात. राजकारणी व्यक्ती समाजाचे भले करण्यापेक्षा स्वतःचे भले करण्याकडेच जास्त लक्ष देतात. ते समाजात अनेक कारणांनी दुही माजवतात. त्यामुळे सामान्य जनता परस्परविरोधी संघर्षातच गुंतून जाते. याचा फायदा घेऊन राजकारणी माणसे आपले काळे धंदे चालूच ठेवतात.

<u>लहान मुलांविषयी चिंतन</u> : आई-वडिलांनी लहान मुलांवर योग्य संस्कार केले पाहिजेत. त्यांच्या भावना गरजा जाणून घेऊन त्यांचे कौतूक केले पाहिजे. त्यांना त्यांच्या चुकिच्या वागण्याची जाणीव करून दिली पाहिजे. जर या गोष्टींची योग्य वयात जाणीव करून दिली नाही, त्यांच्याकडे दुर्लक्ष केले, त्यांना योग्य वातावरण मिळाले नाही, तर मुले बेडर, उनाड, भावनाशून्य, आग्रही होतात. स्वैर वर्तनामुळे त्यांच्या जीवनाला वाईट वळण लागते. बेपर्वा वृत्तीमुळे ही मुले इतरांच्या भावनांची, चांगल्या-वाईटाची कदर करत नाहीत. एका दरिद्री बापाला आपल्या मुलांकडे लक्ष देता येत नाही. आई वडिलांनी मुलांकडे योग्य वयात लक्ष दिले नाही, तर ती कशी बेफान, बेपर्वा उग्र रुप धारण करतात ते दुर्गाबाईंनी दाखवून दिले आहे. अनाथ कलंकित मुलांविषयी दुर्गाबाई लिहीतात, ''मृत किंवा फरारी झालेल्या आई बापांची रस्त्यावर स्वच्छंदपणे वाढणारी संतती हा महानगरातला मोठा चिंतेचा, करुणेचा, शरमेचा विषय आहे. लहानपणीच ही मुले बहकलेल्या वासनांनी शिकार झालेली बहुधा दिसतात.'' या अनाथ, पोरक्या, दरिद्री मुलांकडे दुर्लक्ष झाल्याने त्यांना दुःख, अपमान, निराशा, मानहानी, वेदना यांमुळे उदासीनतेत जीवन जगावे लागले. त्यामुळे ती वाईट मार्गाने जाताना दिसतात.

<u>समारोप</u> : दुर्गाबाई ह्या अभ्यासू, व्यासंगी, चिंतनशील, डोळस लेखिका होत्या. त्यांची दृष्टी सूक्ष्म होती. कोणतीही घटना त्यांच्या नजरेतून सुटत नसे. त्यांचे मन विविध विषयांवर सातत्याने चिंतन करी. कारण त्या स्वतःला जबाबदार नागरिक मानत होत्या. त्यांच्या चिंतनात, विचारात, वेगळेपणा, सखोलता, अभ्यासूपणा, दिशादर्शकता आहे. त्यांचे विचार वाचकाला जीवनाकडे पाहण्याचा सकारात्मक नवा दृष्टिकोन देतात. मानवाला त्याच्या कर्तव्याची जबाबदारीची जाणीव करून देतात. त्यांच्या विचारातून प्रगल्भ, असामान्य, व्यासंगी व्यक्तिमत्त्वाचे दर्शन घडते. त्याचबरोबर दुर्गाबाई भावनाशील, संवेदनशील, रसिक, सौंदर्यदृष्टी असणाऱ्या लेखिका आहेत. त्यांची कल्पकता वाचकाला थक्क करणारी आहे. त्यांचा लेखनाचा थोडक्यात वेध घेणे अशक्य आहे. त्यासाठी त्यांचे लेखन प्रत्यक्ष वाचावेच लागेल.

* * *

# मनातलं गाव

प्रा. सुनिल घनकुटे
(मराठी विभाग)

प्रत्येक गावाला नाव असतं. ह्या नावामागं काही एक कथित इतिहास असतो. त्या त्या कथित इतिहासात गावाच्या सबंधित श्रद्धा, कल्पितकथा, पुराणाचे ठसे, दंतकथांचे काही दर्शनी पुरावे दाखविले जातात. बुरुज, जुनाट बारवा, पडके वाडे, जुनाट वाडा, पिंपळाची झाडं, भुता-खेताच्या गोष्टी दडून असतात. कुठल्या वाड्या बुरुजांच्या बळदात रात्री-बेरात्री रडल्याचा, पाळण्याचा कर्रकर्र आवाज, डोंगरांमधून गाई-म्हशींच्या आवाजा बरोबर लहान मूल रडल्याचा आवाज आल्याचे बोलले जाते. कण्हल्याचा, बांगड्याचा, खळखळ आवाज, घुंगरांचा आवाज ऐकल्याचं अनेक लोक सांगत असतात. लोक त्यालाच जपत असतात. जोपासीत सांगत असतात. गावात त्याच्यावर तोडगा काढणारी मंडळी तत्पर असतात. तस आमच्या गावालाही भैरोबाचं जागृत दैवत असल्याची श्रद्धा लोक आजही बाळगून आहेत. अकोले-ओतूर या रस्त्यावर कोतूळ गावापासून जवळच असलेले पश्चिमेकडे डोंगराच्या कुशीत मांडी घालून बसलेले छोटेसे गाव ! तिनशे- साडेतिनशे उंबऱ्यांचं, खाऊन पिऊन सुखी असल्यालं. या गावाला 'अबिरखिंड' म्हणून ओळखले जाते. पुढे हेच अबिरखिंड, आबितखिंड म्हणून प्रसिद्धीला आले. आजा-पणजाच्या जमान्यात गावाभोवती सगळं जंगलच होत. ह्या जंगलात डोंगराच्या टोकावर भैरोबाचं देऊळ, भैरोबा म्हणजे भैरीनाथ. या देवळात तीन मूर्ती, एक भैरीनाथ, काळभैरी, जोगेश्वरी. हे तिन्ही दैवतं भारतात फक्त तीन ठिकाणी. एक हिमालयात, दुसरे मध्यप्रदेशात आणि तिसरे आमच्या गावात. गोड भैरोबाला शेंदूर लावतात, काळ भैरीला बुक्का लावतात, म्हणजेच 'अबिर' या वरून अंबिर - अबिर आणि त्या ठिकाणी डोंगाची असलेली खिंड त्यामुळे गावाला नाव पडले 'अबिरखिंड'.

गावाला देव-दैवतांची अनेक विखुरलेली ठाणी आहेत. त्या त्या ठाणं-ठिकाणालाही असा काही कथित इतिहास असण्याची शक्याता आहे. नांगरेबाबा, चिमाईवरचा चिमाईदेव, मुक्ताबाई, घाआई, मावलाई, खोकल्याआईचा माळ, गोईल देवाचा दरा. आमच्या शेतातला गवळी, भिवंजीबाबा, जाळीचा वाघोबा, बनोटीतला थडग्याबाबा, देव विहिरीचा उंबरबाबा आणि गावाच्या पश्चिमेस असलेलं, भैरोबाचं देऊळ दोन पिढ्यांनी बांधलेलं, भैरोबाचं जागृत दैवत असल्याची भावना, आजही गावकऱ्यांमध्ये आहे. पूर्वी याच देवळाचं ठिकाण घाट आंबा (आता नाही) नुसता घाट आहे. त्या डोंगराच्या पोटाला देऊळ होतं. त्याच्या पुढच आंब्याचं मोठ झाड होतं. गावाबाहेर असलेल्या या जुनाट देवळात रात्री उशीरानं कुणाची जाण्याची हिम्मत नव्हती. अंधारी रात्र, त्या प्रचंड झाडांमुळं अधिक गूढ, गर्द होऊन रात्र करकरत असल्याचा भास होई. बालकवींच्या 'खेड्यातील रात्र' मधील अनुभव यायचा. 'वडाचा पार अंधार दाटला तेथे भरे भरपूर' 'वाऱ्यात भुते बडबडती' असा भास होई. मंदिराच्या जवळच काठ खचलेल्या आणि टोपलीसारख्या आकाराच्या पसरट विहिरीत आंब्याच्या 'सावल्या पडल्याचा' भास होई.

देवळात आमावस्येच्या दिवशी तेलवात करायची, म्हणजे जीव दडपायचा. घाम फुटायचा. पण आता हा परिसर गेला. जुनं देऊळ अचानक मोडलं. गावातील लोकांनी एकत्र येवून गावाजवळ पण ओसाड ठिकाणी नवीन देऊळ बांधलं. आता दोन भैरोबा बसलेले आहेत. एक पळसुंड्याचा व एक अबिरखिंडीचा. याचीही कथा अजून ऐकायला मिळते. की, अबिरखिंडीचं देऊळ (जुने भैरोबाचे) पळसुंड्याच्या लोकांनी पाडून तो देव तेथून पळविला. पळसुंड्यात बसवण्याच्या इच्छेने, वर घाट चढून गेल्यावर शिव ओलांडताना (आमच्या गावाची) देव पळसुंड्याच्या शिवेत जाईना. त्यामुळे आमच्याच गावाच्या शिवेवर पळसुंड्याच्या लोकांनी नव्या भैरोबाच्या देवळाची स्थापना केली. आणि तो पुळसुंड्याचा भैरोबा ठरला.

गावात मग लोकांनी नवीन मूर्ती तयार करुन भैरोबाच्या मंदिराची स्थापना केली. पण ह्यापेक्षा कितीतरी पटीनं अजून भैरोबा मनात कायम ठाण मांडून बसलेला आहे. पूर्वी हा भैरोबा देव विहीरीवर अंघोळीसाठी यायचा. अंघोळ झाल्यावर सगळे पाणी शेंदराने लाल होऊन पाण्यावर तवंग निर्माण व्हायचा, देवावर पाणी घालणारा गावातील गुरव पहिल्यांदा विहीरीवर जाऊन देवाला पाणी

घालणार, मगच ते पाणी गावात आणलं जायचं. शिवाशिव, इटाळ झालेल्या बायका तिकडे फिरकायच्या नाहीत. विहीर कधी आटली नाही, की विहिरीत कोणी पडलेल मेलं नाही. आता मात्र सगळं गेलं येण्या जाण्यानं. आता माणसं पण मरत्यात हातानं.

गावाच्या आवती भोवती अनेकांचे मसनवटे. आमच्या शेतातही अनेक माणसे पुरली जायची. आणि जाळली जायची. कुणाला 'पाण लागलं' तर रातभर तुपाची वात देवळात पेटायची आणि विष उतरेपर्यंत त्या पाण लागलेल्या माणसाने देवळात बसून वातीकडं टक लावून बघण्याचा रिवाज होता. मग त्या माणसाचं विष उतरायचं, दुसऱ्या दिवशी माणूस ठणठणित बरा व्हायचा. गावभर त्याचं लौकिक व्हायचं. आंघोळ, पाणी धरणे इत्यादी सोपकस्कर व्हायचं.

मारुतीच्या देवळात श्रावण महिन्यात पोथी बसायची. म्हातारी माणसे रस्ते चाचपीत गावातल्या या देवळात टाकून दिल्यागत बसून राहायची. पोथी सुटताच तिथच् आळं करून पडायची. रातभर तेल चाटणाऱ्या कुत्र्यांचा रणकुंदळ चालायचा. वडाच्या, चिंचेच्या झाडावरचे, वटवाघुळं गावभर फेऱ्या मारायची. पिंगळ बोलायचे, तळ्याकडं टिटवी टिव टिव करायची. घुबडं धुत्कारुन तळ्याकडं उडत जायची. यातच वाघाचं दऱ्यात डहाण चालायच. साऱ्या गावभर थरार पसरायचा.

पंचमीच्या दिवशी आमच्या दारातल्या लिंबाला झोक्यांच्या चढाओढी लागायच्या, गावातील वडा लिंबांना दोर टाकायला जागाच मिळायची नाही. जागोजागी झोकं बांधलेलं असायचं. आमच्या घरात दोन तुळ्यांना दोन, दारातील पिंपरीला एक. आणि लिंबाला आख्या गावचा एक मोठा झोका असायचा. टणटणीची पानं, सायरीच्या काता बरोबर पानाबरोबर खाऊन आम्ही पोरं तोंड रंगवीत असू. वर्षातील एकदाच घेतलेल्या नव्या कपड्याला जपत असू. झोक्यावर आळी-पाळीने खेळत असू. अशा वेळी म्हाताऱ्या माणसांचं खेळणं बघून कौतुक वाटायचं. हसू यायचं. 'पाच झोकं खेळलं पाहिजेत' हा समज रुढ होता. म्हणून खेळायचं.

होळीच्या दुसऱ्या दिवसाची 'धुळवड' या दिवसाला विशेष महत्त्व यायचं. होळीच्या निमित्तानं खेळकर पोरांबरोबर म्हातारी पोक्त माणसं 'होळीचे दोन डाव' म्हणून खेळत. कुस्त्या, चिलीलोप, कबड्डी व्हायच्या. धुळवडीच्या दिवशी आमच्या घरून वीर निघायचा, पहिला मीच वीर व्हायचो. मी मोठा झाल्यावर लहान भाऊ व्हायला लागला. मग वीर वाजत गाजत पेटलेल्या होळीला पाच फेऱ्या मारायचा. शिजवलेल्या हरभरे-गव्हाच्या घुगऱ्याचा नैवद्य होळीला ठेवून, मारुतीच्या पाया पडून वीर घरी जायचा. घरातल्या देवाला तळी भरून घुगऱ्या वाटून वीर (देव) गळ्यातून काढून परत देव्हाऱ्यात ठेवला जायचा आणि निघालेला वीर घुगऱ्या खायला, हमसून-हमसून रडायचा.

दसरा झाल्यावर दिवाळीच्या पाच दिवस आधिपासून गावातील आम्ही पोरे कहांडाळाच्या काड्यांचा एखाद्या म्हताऱ्याकडून नाग करून, त्यात दिवा ठेवून गावात गायी, देव ओवाळीत असायचो. देवाची गाणी म्हणत सुंदर हेल काढायचो. मोठाली माणसं सुद्धा कधी-कधी यायची तो आवाज आजही काना-मनात निनादत असल्याचं जाणवतं. हातावर पडणारे तेलाचे ओघळ दिव्याच्या उजेडात चकाकणारा सगळ्या पोरांचा चेहरा, तशा त्या पेटत्या उजेडात अधिकच भडक, उग्र आणि काळपट दगडासारखे दिसायचे; पण मनात कोणतीच भिती त्या वयात तरळून जात नसायची.

या भैरोबावर गावकऱ्यांची भावना भक्तीची तशी कसल्यातरी श्रद्धेनं भारावलेली आहे. त्यातूनच अनेकांचे नवस, सायास, फलद्रुप झाल्याचे कानोकानी आहे. यातूनच या दैवताचा कडवटपणा गावकऱ्यांनी अनुभवलेला आहे. गावाकडून जर काही अघटित घडलं, उपमर्द करणारी घटना घडून आली, तर हा भैरोबा रुसतो, रागावतो; त्याचे परिणाम गावाला काही काळ भोगावे लागतात. दुष्काळ, अवर्षण हा त्याचाच एक भाग असल्याची गावकऱ्यांची श्रद्धा आहे.

जून महिना संपून जुलैचा महिना लागला. पेरण्या करून माणसांना फसल्यासारखं झालं होतं. आभाळानं ताणून धरलं. उभं वारं सुटलं होतं. अवकाळा पडल्याची बोलवा झाली, गावानं धीर सोडला, म्हातारी माणसं बोलू लागली. तरुणांचा आणि पोरासोरांचा विश्वास बसेना कारणही तसच होतं; भैरोबाच्या पुढच्या असलेल्या जुन्या देवळातील काही मूर्ती गावातील लोकांनी टेम्पोत घालून कोतूळच्या देव डोहात नेऊन टाकल्या होत्या. त्यामुळे भगताच म्हणणं होतं की, आमचे भाऊबंद आणून द्या, त्यामुळे मी रुसलो आहे (भैरोबा). नाहीतर पाऊस पडणार नाही. गावात असा रिवाज होता, की पाऊस पडला नाही तर समाधी देव पाण्यात कोंडला जायचा. मी लहान असतांना

आमच्या गावातील माणसे आंभोळच्या महादेवाला पाण्याने कोंडण्यासाठी गेली होती, अनेक गावांनी मिळून महादेव कोंडला होता. केवळ पाऊस पडावा म्हणून. तसं आमच्याही गावातील हे जागृत दैवत पाण्यात बुडविण्यात आलं. पाण्यानं देव कोंडायचा दिवस ठरला. सारा गाव मारुतीच्या देवळासमोर जमला होता. गावातील अंगात येणारी बाया-माणसे पुढे, त्यांच्यामागे सर्व गांव. मारुती ब्रह्मचारी पण त्याच्या देवळात बाईचं वारं. तव्हा माझ्या आईने तुळसा भक्तीनीला विचारलं, 'इधं तुझं वारं कसं काय?'. तव्हा ती म्हणाली, 'माझ्या गळ्यात पाय मारुतीचा फोटो'. हे पाहून तिला आचंबाही वाटला. देव पाण्याने गाडण्यासाठी कोणी हंडा, कळश्या घेऊन तर कोणी टाळ-मृदुंग वाजवत भजन म्हणत आख्खा गाव गात चालला होता. मुरल्या नाना पूजाविधीचं ताट घेवून तयार होता. गावातील सगळी प्रतिष्ठित मंडळी जमली होती. टाळकरी मंडळी, पखवाज घेवून सुताराचा कैलास तयार केला. वरच्या आळीच्या विजुनानानं गंगा-जमुना घागर भरुन त्याच्यावर नारळ ठेवून डोक्यावर घेतली होती. सर्व गावातील बायांनी डोक्यावर पाण्यानं भरलेल्या हंडा-कळश्या घेतल्या होत्या. देवाला गाडण्यासाठी समाधीच्या मंदिरात गेल्यावर पिंडीची पूजा करण्यात आली. बाहेर भजन रंगत होतं. पूजा करता करता साहेबराव अंगात आल्यासारखं करत होता. गुडघं पोटाशी धरून तोंडातल्या तोंडात देवाला विणविल्यासारखं काहीतरी बोलत होता. माणसं ताटकाळून बाहेर त्याची वाट पाहात उभी होती. बायको, पोरी डोक्यावर घागरी घेऊन ताटकाळून त्यांच्याकडं बघत होत्या. आखरीला साहेबराव बाहेर आला. देवळाचं दार माती-विटांनी लिपलं. आत गाभाराभर पाणीच पाणी करून टाकलं आणि माणसं टाळ-पखवाज वाजवित परत साहेबरावाच्या मागे भैरोबाच्या देवळात आली. तिथ पण त्यांच्या अंगात आलं. समज असा होता की, भैरोबा कोपला पण सगळं भक्तानं देवाला कबूल केल्यावर देव शांत झाला. मग सगळं देवाचं वऱ्हाड पूर्वेला गावच्या शिवेवर असलेल्या मुक्ताबाईला पाणी घालण्यासाठी चालू लागलं. अशा प्रसंगी सारे गावकरी देवाकडे पाण्याची विनवणी हात जोडून करत होते. पण चालत असतांनाच ढगाच्या गडगडाटानं मन आनंदून गेले. मुक्ताबाईच्या देवळात पाण्याचा अभिषेक करतांना. मुक्ताबाई अंगात येणाऱ्या बाया देवळात घुमत बसल्या. पाऊस येणार नाही म्हणून ओरडत होत्या. एकीकडे तुळसा भक्तीन पाणी येईल म्हणून ओरडत होती. या सगळ्या गोंधळात पाऊस पडायला सुरुवात झाली. मग आम्ही सगळे भिजतच गावात पोहचलो. पाऊस आल्याचा साऱ्या गावाला आनंद झाला. कोंडून ठेवलेल्या समादिकडे कोणी तीन-चार दिवस फिरकत नाही. फक्त विचारलं जायचं. पाण्याकडं पाहिल का? एखाद्या दिवशी कोणी तरी ते फोडून देतं, त्याची कल्पना आमच्या गावीही नसते.

आता हे सारं बदललं, गावाची आबादी वाढली. वड-पिंपळ, लिंबाची झाडं पडून गेली. काही पाडली. भैरोबाच्या देवळाचा आकार बदलला. गावातील घरं जावून ठिक-ठिकाणी शहरी पद्धत येऊ लागली. सारी माणसं बदलली. मारुतीच देऊळ पडलं. ग्रामपंचायतीचं ऑफिस झालं. तव्हा देवळात शाळा भरत. आता त्या समाजआश्रमातून भरतात. घराघरातून पोरं शिकून रस्त्यावर येऊन बसतात. रोजंदारीच्या कामावर जातात... इंग्रजी आमदानीत या गावाला सांभाळणारी माणसं आता या गावात राहिली नाहीत. चार चांगल्या माणसांची वाण पडलीय. गावाचे गाववैभव आटत चालले. मागच्या काही वर्षात बांगर मास्तर, सखा मास्तर गेले. माणसं गेल्यावर त्यांची किंमत कळते म्हणतात. मास्तरांची किंमत काय करावी? ज्यांनी किंमत करावी, त्या गावाला ही भली माणसं कळलीच नाही. गरीबीशी संघर्ष करीत करीत या माणसांनी गावाची शाळा चालविली. गावातील एक पिढीच्या पिढी घडविली. 'बाप, चुलते', गावातील वयस्कर शिकलेली माणसं त्यांचेच विद्यार्थी. त्यांच्यासमोर सुपारीचं खांड खात नसत, हा नैतिक दरारा होता. गावाला मानसिक आधार होता. गावाला एक 'बळ' होतं. मी अकोल्याला कॉलेजमध्ये असताना सखाराम मास्तर एकदा अचानक भेटले. 'आरं तुला मारलं म्हणून तू पुढं आला, नाहीतर बाकीच्यांच्यावाणी असता,' असे म्हणाले. तव्हा लांब-लचक सुस्कारा टाकून सांगत 'गावासाठी जगावं,' अन् गावासाठी मरावं वाटतं..? आता गाव सुनं-सुनं वाटतं, पाठमोरं झाल्याचं दिसतं. माणसं, झाडं, गुरंढोर आणि सगळं रान-शिवार आता केवळ आठवणीतूनच साठवायचं! काय करावं दुसरं..?

* * *

# जीवन

**कु. प्रणाली अविनाश देशमुख**
(टी.वाय.बी.एस्सी 'केमेस्ट्री')

जीवनाचा अर्थ कुणाला कळला आहे काय? जीवनाला अर्थ तरी असतो का? या प्रश्नांची उत्तरं निश्चितपणे देता येतील, असं मला तरी वाटत नाही. पंडितांनी आणि तत्त्ववेत्यांनी याबद्दल पुष्कळसा घोळ घातला आहे. माझ्यासारखी सामान्य मुलगी जीवनाचा अर्थ जगण्यात आहे असेच म्हणेल...

एका तत्त्वचिंतक कवीनं, जीवनाचं स्वरूप नेमक काय ते आपल्याला सांगता येत नाही असं म्हटलं आहे. तो म्हणतो की, ''हे जीवन अमृतमय आहे की विषमय आहे काही कळत नाही. अनेक परस्पर विसंगत गोष्टींनी ते ठासून भरलेलं आहे. कुठं वीणेचे मधूर सूर कानांवर पडत आहेत, तर कुठं शोकमग्न झालेल्या लोकांचा आक्रोश ऐकू येत आहे. कुठं विद्वानांची आनंददायक चर्चा चाललेली आहे. तर कुठं दारु पिऊन धुंद झालेल्या उन्मत्त लोकांची शिवीगाळ आणि भांडणं चाचली आहेत. एखाद्या ठिकाणी म्हातारपणानं वाकलेल्या सुरकुतलेल्या वृद्धेचं केविलवाणं दर्शन मला व्यथित करीत आहे. जीवनाबद्दल नेमकं काहीच कळत नाही'' हे त्या तत्त्वचिंतकांना दीर्घ आयुष्य जगल्यानंतर कळालं.

जीवनामध्ये कधीतर सारं मोडून पडलं असं वाटतं, पण पुन्हा कुठल्यातरी अदृष्य हातांनी ते सावरलं जातं. काळेकुट्ट ढग जमतात, उन्मत्त वारा वाहू लागतो. या वादळात आपलं आयुष्य उद्ध्वस्त होऊन जाणार या कल्पनेनं आपण हादरतो; पण एकाएकी ढग वितळून जातात. वारा सौम्य होतो. क्षितिजावर चंद्राची कोर दिसू लागते. जीवनाची ही परस्परविरोधी दर्शनं खरोखरच गूढ आहेत.

''क्षणात येते सरसर शिरवे, क्षणात फिरुनी ऊन पडे''
हेच आहे का जीवनाच स्वरूप ?

मला तर वाटतं चमत्कृतीतच या जीवनाचं सौंदर्य साठवलेलं आहे. कोणत्या वेळी या जीवनप्रवाहाला कोणतं वळण मिळेल हे मात्र सांगता येत नाही. कोणत्या तरी तर्कशुद्ध नियमाप्रमाणे माणसाचं आयुष्य घडत असतं तर ते सुंदर वाटलं नसतं. प्रत्येक क्षण बेभरवशाचा आहे, चंचल आहे, म्हणूनच या जीवनात खिळवून टाकणारी एक जबरदस्त शक्ती आहे. जीवनाची वळणं तरी किती वेडीवाकडी आणि गमतीदार असतात. अनेक अघटित घटनांनी आणि योगायोगांनी जीवन भरलेलं असतं. खरं तर जीवन हे सुद्धा योगायोगाचं प्रतीक मानता येईल.

माणूस आणि निसर्ग कंटाळवाण्या जीवनप्रवाहातून प्रवास करीत असतात. असं मला कधीच वाटत नाही. प्रतिवर्षी येणारा पावसाळा नव्यानं आनंदाच्या धारा घेऊन येतो. पावसाळ्याच्या दिवसांत केवळ पाऊस पाहण्यासाठी आणि तो अंगावर झेलण्यासाठी कितीतरी लोक आतूर असतात. याउलट पावसात भिजण्याच्या कल्पनेनचं हुडहुडी भरणारी जी माणसं असतील. ती दारं-खिडक्या बंद करून अंगावर गरम कपडे घेऊन सुरक्षितपणे बसलेली असतात. ''या पावसाची रिपरिप लवकर संपली तर बरं होईल.'' हा एकच भाव त्यांच्या मुद्रेवर असतो.

'पाऊस आला की माणसे छत्री उघडतात
त्यांच्या मते भिजण्यापासून ते वाचतात.
पण मला वाटतं जीवनातील एका
सुखद क्षणाला ते मुकतात'.

प्रत्येक पावसाळ्यातलं पाणी नवीन असतं, पावसाचे थेंब दरवर्षी अंगावर घेणारी आणि रोमांचित होणारी ती धरणी नवीन असते. आकाशातले काळे मेघ नवीन असतात. आकाशही नवीनच असतं. ही नाविन्याची अनुभूती माणसाला येत असते. म्हणूनच त्याला आयुष्य चाकोरीसारखं एकसुरी वाटत नाही. किती शतकं उलटून गेली कुणास ठाऊक ! पण प्रत्येक दिवशीच्या सूर्यकिरणातली जादू अजून ओसरली नाही. त्यांच्या स्पर्शाबरोबर येणारी जाग नवीन असते. सुख-दुःखाचे अनेक रंगबेरंगी प्रकार आहेत. म्हणून तर दुःखी माणसालाही जीवनाची संगत सोडवत नाही.

जीवन हे चंचल आहे आणि काचेच्या भांड्यासारखे ठिसूळ. केव्हातरी खळकन फुटणार आहे, हे अटळ सत्य आहे. म्हणूनच ते अनमोल आहे. जीवन हे कमळाच्या पानावरील दवाच्या थेंबासारखं अल्पजीवी आहे, हे कुणाला माहित नाही? अल्पकाळ का असेना पण जीवनाचा हात माझ्या हातात असू देत असच आपल्या सर्वांना वाटत असतं. क्षणभंगूर असूनही जीवनाला एक गहिरं, अवीट असं सौंदर्य आहे. त्याच्या चंचलतेपेक्षा त्याच्या विविधतेचं (आणि विचित्रतेच) आकर्षण सर्वांनाच अधिक वाटतं.

हुलकावण्या देण्यात वंचना करण्यात जीवन हे अत्यंत हुशार आहे. आजपर्यंत त्यानं भल्याभल्यांची प्रतारणा केली आहे. कधी त्यांना सिंहासनावर बसवलं आणि लहर येईल तेव्हा काट्याकुट्यात फेकून दिलं. या लहरी जीवनाचा शोध घेण्याची आपली उर्मी कधी थांबणार नाही. जीवनाची गती ही कधी कुंठीत होणार नाही. त्याच्याविषयी विचार करताना तर मी थकूनच जाते. विचारापेक्षा भारावलेल्या मनानं त्याचा स्वीकार करणं, त्यात गुरफटून जाणं, त्याच्या बरोबर हसणं अन् रडणं आणि त्याला बिलगून जगणं यातच एक वेगळा आनंद आहे.

नित्य नव्याचा नजराणा घेऊन हे जीवन आपल्या पुढ्यात नवनवीन गंध उधळीत असतं. ते थोडे कळले आहे असे वाटते आणि खूप कळलेच नाही असे समजते. पण या जीवनाचे चषक भरभरून प्यावे, केव्हातरी हातातला चषक रिता होणारच आहे; पण त्यातला थेंबन्‌थेंब पिऊन घ्यावा. तो कडवट असेल.

जीवन हे असं रसायण आहे की त्यात सूर्याची उर्जा, फलपाखरांचे रंग, कमळाच्या पाकळ्या, विषाची दाहकता, साधुसंतांची वत्सलता, तरुणींच्या नेत्रातली चंचलता आणि नृत्यांगणाची नादमयता यांचं मिश्रण आहे. आपल्या नेत्रांत सामावेल तितके ते भरून घ्यावे. अन् त्यातूनच त्याचे रंग अन् ढंग समजून घ्यावे.

यावर कुणी तरी मला असं म्हणेल जीवनाच्या इतिहासाचं प्रत्येक पान मानवाच्या हातून घडलेल्या पापाने बरबटलेलं आहे. अन्याय, सूड, हिंसा यांचं थैमान चालू असलेल्या जगात जीवनाच्या सुंदरतेचं गीत गात बसणं बरं नव्हे इथं रात्रंदिवस शोषण चालू आहे. इथे जीवनात येणाऱ्या प्रत्येक क्षणाला मृत्यूचा बलात्कार चालू आहे. कशाला जीवनाचं हे गोड तुणतुणं वाजवायचं..?

ह्या प्रश्नांवर माझ्याकडे उत्तर नाही प्रश्न चुकीचाही नसेल कदाचित !

यावर मला मर्ढेकरांच्या त्या प्रसिद्ध ओळी आठवतात,

''अजून येतो वास फुलांना
अजून माती लाल चमकते
अजून खुरट्या बुंध्यावरती
चढून बकरी पाला खाते''.

यापेक्षा अधिक काय सांगणार...?

* * *

# हरिण

**नीलम नागरे**
(एम.ए.-१, मराठी)

एखाद्या सुंदर, गहिऱ्या डोळ्यांचं हरिण विलक्षण गतीने आणि चपळतेने धावत असते. आपली नजर काही केल्या त्याच्यावरून हटत नाही. पण ती वेधवती गती साधतांना हरिणाचा डौल, त्याची अंगभूत लय किंचितही सुटत नाही. अत्यंत ग्रेसफुली स्वतःला सांभाळत डौलदारपणे हरिण धावत असतं. स्त्रीच्या शरीर सौंदर्याची जादू स्वतःमध्ये शोधतांना ज्यांचं आयुष्य मी पडद्यावर जगते, त्या स्त्रियांच्या व्यक्तिमत्त्वाभोवती त्या जादूचं वलय गुंफतांना मला सारखे ते हरिण दिसत असते. मनाच्या गुहेमध्ये खोल लपलेल्या एका लसलसणाऱ्या कोंभाला हलक्या हाका घालून फुलवणारी आणि तो फुलवा शरीरातून व्यक्त करणारी 'सेन्शुॲलिटी' माझ्या दृष्टीने त्या हरिणीसारखी असते. त्यात एक बेधडकपणा असतो. पण तरीही एक विलक्षण नजाकत असते. मोहकता असते. जे रेशमी, मुलायम पोताचं असतं, तजेलदार असतं, उमललेलं पण उघडं नव्हे ! नग्नही कदाचित पण नागडं नव्हे ! आक्रमक शरीर आकर्षण अन् भुलवणारी मोहकता यात फरक असतोच. शेवटी 'सेक्सी इज डिमांडींग ॲण्ड सेन्शुअस इज कमांडिंग' हे उद्गार आहेत. 'उलाला गर्ल विद्या बालन'चे जिने नुकताच 'डर्टी' पिक्चरसाठी सर्वश्रेष्ठ अभिनेत्रीचा पुरस्कार पटकाविला.

ती म्हणते, ''मी अगदी साधी होते. रंगही काळा-सावळा त्यामुळे मला सतत टोमणे बसत. 'मी कशी आहे?' या प्रश्नाचं उत्तर शोधत मी किती झगडलेय स्वतःशी! त्या काळात मी स्वतःला सांगत असे, 'तुझा आवाका निराळा आहे, तुझ्या क्षमता निराळ्या आहेत, त्यावर विश्वास ठेव. त्या विश्वासाचं बोट धरूनच मी इथवर पोहोचले'.

तुम्ही शरीर असता याचा अर्थ तुमच्याकडून काही तरी अपेक्षित आहे. त्याला वासनेची छटा आहे. हरिणीच्या डौलात वासनेपेक्षा कुतूहल, अद्भुतता व मनभावन आकर्षण असते. यातली रेघ धूसर व निसरडी असली तरी ज्याला ती जपता आली ती व्यक्ती स्वतःभोवती एक न दिसणारं वर्तुळ घेऊन वावरत असते. त्या व्यक्तिंच्या चालण्याबोलण्यात दिसण्यात असणारी नजाकत बघणाऱ्यास आचंबित करून जाते. अशावेळी देहबोली ही आपली ताकद असते. मी हे आता का सांगतेय? कदाचित मलाही अचंबित करणाऱ्या माझ्या नव्या रुपाला मी पडद्यावरच्या भूमिकेत शोधतेय म्हणून? त्यातून माझ्या हाती काही लागलेय का, ते शोधून पाहवं म्हणूनही!

ते दिवस माझे स्ट्रगलचे होते. मी प्रख्यात दुचाकींची जाहिरात करीत होते. जाहिरातीत एक पणती लावायची होती. एक दोन रिटेक झाल्यावर दिग्दर्शकही मला म्हणाले, 'विद्या युवर हॅण्डस आर डेड!' मला काही सुचेनाच. नंतर मला त्या भल्या दिग्दर्शकाने सांगितले, 'दिवा पेटवताना मनातील भाव चहऱ्यांपुरतेच मर्यादित राहून कसं चालेल? ती भावना देहबोलीतूनही व्यक्त व्हायला हवी.' या शिकण्याच्या प्रक्रियेतून मला माझ्या व्यक्तिमत्त्वातील 'सेन्शुॲलिटी' हळूहळू सापडत गेली. मी सुंदर दिसते, मोहकही पण सेन्शुअसही दिसते, ही दाद मला सुखावणारी होती. पण स्वतःची ओळख नव्याने देणारी होती. 'परिणिता' पासून 'डर्टी' पिक्चरपर्यंत विविध प्रकारच्या भूमिकांमधून मी मला उलगडत गेले. मला वाटतं माझ्यातील सेन्शुअसनेस ही निसर्गाने दिलेली देणगी. तुमचं शरीर कितीही थकलं, त्यावर सुरकुत्या पडल्या तरीही तुमच्यात असणारी मोहकता धूसर होत नाही.

खरं तर स्त्री असणंच किती सुदंर आहे! पण आपण त्या दृष्टीने स्वतःकडे कधीच पाहत नाही. आपण स्वतःच्या असण्याला किती वेळा दाद देतो? किती वेळा स्वतःचा आदर करतो? मला माझ्या स्त्री असण्याचा नुसता अभिमानच नाही, तर स्त्रीपण मी मनापासून आनंदाने उपभोगते. निसर्गाचे विशेष प्रेम आहे भारतीय स्त्रीवर. मार्दव, कल्पकता, संवेदनशीलता, मुळांशी घट्ट राहत माणसांना जोडून ठेवण्याचे कसब. स्त्रीत्त्व हा एक सोहळा आहे, एक उत्सव आहे. आपले विचार-आचार, दिसणं, भाव-भावनांचा आपल्याभोवती सुरेख विणलेला गोफ, या गोष्टी आपणच आपल्याकडे प्रसन्नपणे पाहत राहण्याइतपत सुंदर आहेत. माझी बहीण म्हणायची, अभिनय तुमच्या चेहऱ्यात नसतो तर तुमच्या डोळयांत असतो. तिचं हे

बोलणं मी काळजाशी घट्ट धरून ठेवलं आहे.

सत्तर-ऐंशीच्या दशकात दक्षिणात्य सिनेमात बिनधास्त वावराने चर्चेचा विषय बनलेली सिल्क स्मिता मला डर्टी पिक्चरमध्ये साकारायची होती. सिल्क स्मिताची भूमिका वठवणे सोपे नव्हते. एक स्त्री, जी स्वतःचं शरीर उघड्या-वाघड्या पद्धतीने सिनेमात वापरते, भावना चाळवणारी मादक दृष्य देते. नग्नतेला व वासनेला थेट पुढ्यात आणून ठेवते. तरीही लोकांना तिच्या शरीर असण्यापलिकडे तिच्याबद्दल कुतूहल वाटते. तिच्या मनाचा तळ गाठण्याविषयी उत्सुकता वाटते. तिच्या जगण्याचे पदर उलगडून पाहावेसे वाटतात. अशा एका स्त्रीच्या आयुष्याचा आलेख पडद्यावर साकारायला मिळणे, ही माझ्यासाठी भाग्याची व कसोटीची गोष्ट होती. मला सिल्क स्मिताच्या भावनिक वादळांमध्ये स्वतःला गुदमरून घ्यायचे होते. शरीराचा अत्यंत खुलेपणा व मनातला कोंडलेला आक्रोश या परस्पर विरोधी गोष्टी एकाच वेळी जगून दाखवायच्या होत्या. या व्यक्तिरेषेतील शरीराचा खुलेपणा तुमच्या सेन्शुॲलिटीच्या पुढचा भाग होता. त्यात आक्रमक बोल्डनेस, लैंगिक आव्हान, वासनाही होती. माझा संघर्ष होता तो स्वतःच्या शरीराविषयीच्या जाणिवा सैल करण्याचा. स्वतःच्या शरीराविषयीच्या स्वाभाविक आकर्षणापलीकडचे आणि प्रत्यक्ष उपभोगापलिकडचे असं काही तरी शोधायचे होते मला. मी माझ्या शरीराभोवती एक रेघ आखलेली होती, ती पुढे ढकलता-ढकलता दमछाक झाली खरी पण मला एक नवी रेघही शोधता आली.

एक स्त्री, जिने स्वतःच्या जाणिवा दडवून ठेवत स्वतःच्या शरीराचा येथेच्छ वापर केला. वापर होऊ दिला, शरीराला चिकटलेल्या संवेदना नष्ट करून तिने पडद्यावर आपल्या अदांचे जलवे जगाला दाखविले. ज्या क्षणी मी ती रेघ पुढे ढकलली. माझी अभिनेत्री म्हणून असणारी अस्वस्थता, घालमेल झपाटयाने कमी झाली. एका व्यक्तिच्या जगण्याचा आलेख मांडताना एक कलावंत म्हणून तुम्हाला त्या व्यक्तिने अनुभवलेले आनंदाचे, समाधानाचे क्षण जसे नव्याने अनुभवता येतात. त्याचप्रमाणे भोगलेल्या यातना, जिवघेणा कलह, मानहानीचे क्षणही सोसावे लागतात. कितीही त्रयस्थपणे विचार केला तरी प्रत्येक वेळी ते शक्य होत नाही. मनात दमछाक होतेच!

'परिणिता'चा काळ असा होता की, त्या काळात मी स्वतःला शोधीत होते. ते दिवस अस्वस्थ करणारे होते. आपण कसं दिसलं पाहिजे म्हणजे लोक आपल्याला ॲप्रिशिएट करतील. सल्ले, सूचना, टीका या सगळ्यांच एक वर्तूळ पूर्ण झाल्यावर मला माझं फॅशन स्टेटमेंट साडीत गवसलं. तोपर्यंत मला काही गोष्टी उमगल्या होत्या. आजुबाजूच्या प्रत्येकाच्या अपेक्षा उरावर घेऊन धावणं मी बंद केलं होतं. इतरांच्या फॅशनच्या कल्पना स्वतःवर प्रत्यक्ष अप्रत्यक्षपणे लादणं बंद केलं होतं. मी पहिल्यांदा स्वतःला विचारलं, तुला स्वतःला काय आवडतं? तू काय घातलंस तर सगळ्यात छान दिसतेस? तू कोणत्या कपड्यामध्ये अगदी सहज असतेस? तुला काय भावतं? तुझ्यातील मोहकता कशातून खुलते? तुझ्यातल्या सेन्शुॲलिटीमध्ये भर घालतील असे कपडे कोणते? आणि माझ्या मनाने साडीला कौल दिला. साडीने माझ्या व्यक्तिमत्त्वावर भर घालून त्याला वेगळे आयाम दिले. मला स्वतःविषयी जगाला जे सांगावसं वाटतं, ते सांगण्याचं काम काही प्रमाणात माझ्या साडयांनीही केले. मला नेहमी भारतीय कपडे आवडतात आणि त्यातही साडी हा माझा अत्यंत आवडता पोषाख आहे. कारण तीत शरीराचा नेमका भाग झाकला जातो आणि आवश्यक तेवढा भाग खूलून येतो. समोरच्याच्या मनात निर्माण होणारं कुतूहल साडीच्या मिऱ्यांमध्ये दडलेलं असतं. आज माझ्या टिपिकल कांजीवरम साड्यांची चर्चा होते. माझ्या घट्ट बांधलेल्या अंबाड्यामध्येही जगाला फॅशन स्टेटमेंट सापडतं कारण मी मला एन्जॉय करायला शिकले आहे. माझ्या स्त्री असण्याचा उत्सव प्रत्येक क्षणी साजरा करायला मला आवडतो. म्हणून मला ते हरिण सारखं खुणावत असतं.''

विद्या बालन ही गुणी अभिनेत्री आहे. तिला आपल्यातील सौंदर्याची नेमकी जाण आहे. ती सुंदर आहेच पण तिच्या विचाराचं सौंदर्य अधिक लोभस आहे. ते तिच्या देहबोलीतून उमटतं. स्त्रीने स्वतःला कसं प्रकट करावं, याबाबतचे तिचे विचार लक्षणीय आहेत. भारतीय स्त्रीच्या सौंदर्याचे नेमके रूप तिने या मनोगतातून उलगडलेले आहे.

* * *

# बाप

कु. सुवर्णा बाळासाहेब धुमाळ
(एस.वाय.बी.कॉम)

आई घराचे मांगल्य असते, तर बाप घराचे अस्तित्व असतो. पण घराच्या अस्तित्वाला खरच कधी आम्ही समजून घेतलय काय? बापाला महत्त्व असूनही त्या-बद्दल जास्त लिहिलं जात नाही. बोललं जात नाही. कोणत्याही व्याख्यानात आई विषयीच बोलतो. संत महात्म्यांनीही आईचेच महत्त्व अधिक सांगितले. देवादिकांनी आईचे गोडवे गायिले. लेखकांनी, कवींनी आईचेच कौतुक केले. चित्रपट तयार झाले (ते आईचेच). मोठेमोठे पुरस्कार दिले जातात तेही आईच्याच नावाने. चांगल्या गोष्टींना उपमा दिली जाते तिही आईचीच. पण बापाबद्दल काय? काही लोकांनी बाप रेखाटला पण तामसी, मारझोड करणारा समाजात एक-दोन टक्के बाप असेही असतील; पण चांगल्या बापाबद्दल काय?

आईकडे अश्रूंचे पाट असतात; पण बापाकडे संयमाचे घाट असतात. आई रडून मोकळी होते; पण सांत्वन बापाला करावे लागते. रोजच्या जेवणाची सोय करणारी आई आपल्या लक्षात राहाते; पण आयुष्याच्या शिदोरीची सोय करणारा बाप आपण सहज विसरतो. सर्वांसमोर आई मोकळ्या मनाने रडू शकते. पण बापाला रडता येत नाही. म्हणून बाप रात्री उशीत तोंड खुपसून मुसमुसतो. स्वतःचा बाप मेला तरी बापाला रडता येत नाही कारण छोट्या भावंडांना जपायचं असतं. आई मेली तरीही रडता येत नाही कारण बहिणींना आधार द्यायचा असतो. जिजाबाईनी शिवबा घडविला असे आवश्य म्हणावे. पण त्याचबरोबर शहाजीराजांची झालेली ओढाताण विसरून चालणार नाही. देवकीचं यशोदेचं कौतुक अवश्य करावं पण यमुनेच्या पुरातून मुलाला डोक्यावर घेऊन जाणाऱ्या वासुदेवाला विसरून चालणार नाही. कौसल्येचं रामाविषयीचे प्रेम आवश्य सांगावं पण पुत्र वियोगाने मरणाऱ्या दशरथाला विसरून चालणार नाही.

बापाचं मुलीवरती किती प्रेम असतं हे बाप झाल्याशिवाय कळत नाही. बाप मुलामुलींना नवीन कपडे घेतो मात्र स्वतः फाटके कपडे घालतो. मुलगा सलूनमध्ये ४०-५० रुपये खर्च करतो. मुलगी ब्युटी पार्लरमध्ये ५०-६० रुपये खर्च करते. पण बाप मात्र साबन संपला म्हणून बिना साबणाची दाढी करतो.

छोट्या संकटांकरता आई असते, तर मोठ्या संकटाकरता बाप असतो. हाताला चटका बसला, ठेच लागली तर आई गं ! शब्द बाहेर पडतो, पण रस्ता ओलांडताना एखादी गाडी अंगावर आली तर बाप रे ! शब्द बाहेर पडतो. कोणत्याही परीक्षेच्यावेळी आई जवळची वाटते. कारण ती कौतुक करते. पण गुपचूप पेढे आणणारा बाप आपण का विसरतो.

मुलाच्या नोकरीसाठी साहेबांपुढे लाचार होणारा बाप, मुलीच्या स्थळासाठी उंबरे झिजवणारा बाप, मुलांना चांगले वळण लागावे यासाठी धडपडणारा बाप, घरासाठी स्वतःच्या व्यथा दडपणारा बाप, घराच्या मानाकरिता अपमान सहन करणारा बाप सर्वच जण विसरून जातात.

* * *

## प्रेमरंग

**कु. प्रांजली भास्कर फापाळे**
( १२ वी वाणिज्य 'ब' )

''पोथी पढे पढे सो पंडित भया न कोय
ढाई अक्षर प्रेम का पढे सो पंडित होय.''

असा सरळसाधा अर्थ संत कबीरजी सांगून गेलेत तरी प्रेमाचा अर्थ आपापल्या परीने काढतच असतो. प्रेम म्हणजे काय? प्रत्येकाची वेगवेगळी संकल्पना असू शकते. पण प्रेम म्हणजे फक्त घेणं नव्हे, प्रेम म्हणजे केवळ संवाद नव्हे, प्रेम म्हणजे केवळ सहवास नव्हे आणि केवळ हातात हात आणि विरघळून टाकणारी मिठीही नव्हे... प्रेम म्हणजे न मागता देणं, न बोलता ऐकत राहणं, प्रेम म्हणजे शब्दापलीकडे व्यक्त होणं, प्रेम म्हणजे दुराव्यातही साथ निभावणं.

वात्सल्य, माया, कर्तव्य, करुणा, निःस्वार्थ, सहकार्य, त्याग, पावित्र्य आणि एकनिष्ठ असणे याप्रमाणेच प्रेमाच्या अनेक छटा आहेत. प्रेम ही संकल्पनाच अतिशय व्यापक आहे. प्रेम ही अतिशय निरागस, निर्मळ भावना आहे. परंतु 'तो' व 'ती' यांची लव्हस्टोरी एवढच प्रेमाचं उदाहरण नव्हे तर, आई-वडिलांची असलेली काळजी, बहीण-भावाची असलेली माया. मित्र-मैत्रिणी मध्ये असलेली सहकार्याची भावना शिक्षकांसाठी असलेले आदरयुक्त प्रेम अशा अनेक छटा आहेत प्रेमाच्या.

प्रेम म्हणजे आपल्या अंतःकरणात वसणं,

आपल्या नजरेतून झळकतं, आपल्या मनाला टवटवी आणतं ते प्रेमच असतं, जे जगण्याची उर्मी वाढवतं ते प्रेमच असतं. जे त्याग करायला शिकवतं, मनाला वेगळच समाधान देतं, प्रेम हे शब्दांविना भावना जाणते.

खरे तर प्रेम ही संकल्पनाच मुळी,

कडाक्याच्या उन्हात हलकिशी पावसाची सर यावी आणि धगधगत्या वसुंधरेला शीतलतेची भेट द्यावी. त्या शितलतेचा सुगंध सगळ्या आसमंतात चिरकाळ दरवळावा अशी आहे.

प्रेमामुळेच तर कित्येकांच्या जीवनात बदल घडून येतात. त्यांच्या वाळवंटासारख्या जीवनात हिरवळ निर्माण होते.

प्रेमात विश्वास हवा, समजून घेण्याची कुवत हवी, सुख-दुःखात सहभागी व्हायला हवं, प्रेमात निःस्वार्थपणे झिजणं हवं. प्रेमाचा अर्थ कळला तरच, आयुष्याला अर्थ प्राप्त होतो. प्रेम ही भावनाच आपल्या जीवनाला अर्थपूर्ण बनवते. मनाला श्रीमंत बनवते आणि प्रेमाच्या इमारतीचा पाया फक्त विश्वास असतो.

* * *

## मैत्री

**कु. प्रणाली अविनाश देशमुख**
(टी.वाय.बी.एस्सी 'केमेस्ट्री')

मैत्री ही तेजस्वी शक्ती आहे. जी काहींनाच नशिबाने मिळते आणि ही शक्ती खऱ्या मित्र-मैत्रिणींजवळ असते पण खरे मित्र-मैत्रिणी शोधूनही सापडत नाहीत. तर त्यांचा सुवास मृगाच्या नाभीतील कस्तुरीसारखा असतो. जवळ आल्याचा भास होताच हातून निसटून जातात. पण ते तितकेच दुर्मिळ असतात. ते सर्वांना मिळत नसून मिळण्याची आशा सर्वजन करत असतात. समुद्रात शिंपल्यांनी सदा आशेने उन्मीलीत असावे हे बरे कारण, पण स्वातीच्या जलधारा केव्हा पडतील आणि ते जलबिंदु शिंपल्यात शिरून त्यांचे मोती केव्हा होतील हे मात्र कुणाला सांगता येत नाही.

त्याचप्रमाणे आयुष्यात केव्हा चांगले मित्र मैत्रिणी येतील आणि आयुष्याचं सोनं करतील हे सांगता येणार नाही.

माणसाने शब्दांशी मैत्री करावी मग हळूहळू वाक्यावरून भाषेसोबत मैत्री करावी. एक व्यक्ती म्हणून एखाद्याशी मैत्री करावी.

निखळ, निर्मळ, मैत्री खरी मैत्री असते,
इंद्रधनुष्याच्या धवलरंगासारखी
कधी-कधी काळ्या-कुट्ट ढगासारखी
निळ्या आभाळासारखी
पर्जन्यधारेच्या वृष्टीसारखी
पहिल्या पावसाच्या सरीने दरवळणाऱ्या वसंतात बहरलेल्या पारिजातासारखी
आणि दुःखाच्या उन्हाने होरपळलेला
तरीही फुलतच राहिलेल्या पळसासारखे

मैत्री टिकविण्यासाठी हवी असते सहृदयता, प्रोत्साहन, प्रेम, निस्वार्थीपणा, सौम्यता, विश्वास, भाषा आणि नम्रता.

मैत्रिशिवाय म्हणजे वल्हविणाऱ्याशिवाय होडी अन् आईशिवाय बाळ होय.

मैत्रित हवं एक नातं शब्दाचं अन् विश्वासाचं

काळ्याकुट्ट ढगाला एखादी रुपेरी किनार असावी, त्याचप्रमाणे आपल्या आयुष्याला मैत्रिचे संपन्न असे वलय असावे, अन् आपण ते जीवापाड जपावे.

निसर्गाला रंग हवा असतो
फुलाला गंध हवा असतो
तर मग माणूस तरी एकटा जगणार
त्यालाही मैत्रिचा छंद हवा असतो.

माणसाच्या अनेक व्याख्या करण्यात आल्या आहेत. कुणी त्याला विचार करणारा, कुणी समाजात राहणारा तर कुणी हसणारा असे त्याला संबोधले आहे. पण माणसाने माणूसपण सर्वार्थाने स्पष्ट करणारी व्याख्या करायची झाल्यास मी असेच म्हणेन की, माणूस हा मैत्रीचे स्वप्न पाहणारा प्राणी आहे.

माणूस हा एकमेव प्राणी आहे. की जो निरनिराळ्या रंगछटांनी मैत्री रंगवू शकतो. तिला फुलवू शकतो. पशू-पक्ष्यांना स्वप्ने पडतात की नाही हे सांगता येणार नाही. बहुधा नसावी. स्वप्ने पाहण्यासाठी कल्पनाशक्तिचे पंख असावे लागतात. वास्तवाच्या जमिनीवरून सरपटणाऱ्या जीवजंतूंना हे पंख कुठून मिळणार? वास्तवाची सृष्टी अपूर्णतेने भरलेली आहे. या वास्तव जगात सुंदर व शीतल अमृताचे सिंचन करणारा चंद्र आहे; पण त्याच्यावर डाग पडलेले आहेत. त्याला क्षयरोग जडला आहे. तो एकेक कलेने उणा होत जातो. आणि अमावस्येचा काळोख त्याला गिळू शकतो. ताजी टवटवीत फुले थोड्याच वेळात सुकून जातात. उन्हाळ्यात नदी कोरडी पडते. पक्ष्यांची पिसे गळून पडतात. आज सुंदर असलेल्या स्त्रीच्या तारुण्याची जादू काही वर्षातच ओसरून जाते, वास्तवाच्या या जगात कितीतरी उणीवा आहेत. पण या साऱ्या मर्यादांचे पाश मैत्रिच्या स्पर्शाने तुटून जातात. मैत्रिच्या भाषेला अन् मैत्रिच्या नात्याला कुठल्याही उणीवा आणि बंधनं नसतात. कारण मैत्री ही अशी असते -

'उरते पण सरत नाही
करूनही सारं काही
पण मन मात्र भरत नाही'.

शेवटी एवढेच म्हणेल -

'मैत्री असावी गुलमोहरासारखी
उन्हाळ्यातही फुलावी
आयुष्य संपल्यावरही नव्याने
मातीमध्ये रुजावी'.

* * *

# ''सलाम माझ्या अगस्तिला''

**अमोल विष्णु तोरकडी**
(टी.वाय.बी.एस्सी, 'फिजिक्स')

''उगवत्या सूर्याला मावळावे लागते
बहरलेल्या फुलाला गळावे लागते,
पडलेल्या गारांना विरघळावे लागते,
आणि आठवणींना विसरून जगावेच लागते,
जगावेच लागते...''

महाविद्यालयीन युवकाच्या मनात अशा आठवणी येतात आणि क्षणात विरून जातात परंतु त्या सदा-सर्वदा सांगतात-

हे युवका तू अगस्तिच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या आणि त्याचेच नाव धारण केलेल्या : अगस्ति कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात शिकलास. होय ह्याच कॉलेजने तुला कधी हसवले, रुसवले, अडवले, दडवले आणि शेवटी एक उत्तम नागरिक म्हणून घडवले. अशा ह्या कॉलेजला माझा सर्वप्रथम सलाम!

राकट-रांगड्या, निसर्गसंपन्न वेली-वृक्षांनी नटलेला, डोंगर दऱ्या-खोऱ्यांनी वेढलेला, गिरीदुर्गाच्या सुरक्षेत, मुळा-प्रवरा ह्या नद्यांनी पावन केलेला संपूर्ण महाराष्ट्रात यांच्या शिरपेचातला एक आदिवासींचा मानाचा तुरा, असा अकोले तालुका. ह्याच अकोले तालुक्यात ज्ञानदान करणारे माझे तुमचे आणि उद्याच्या युवा पिढीचे हक्काचे अगस्ति महाविद्यालय.

'साहसे श्रीः प्रतिवसति।' खरोखर हे वाक्य किती समर्पक आहे. ह्या सुभाषितापुढे आकाशही ठेंगणे जणू. सन १९७२ मध्ये दुष्काळाने महाराष्ट्रातील मनुष्य,प्राणी, पक्षी, वनस्पती, डोंगर-दऱ्या, माती पाण्याविना कासाविस झाली होती. ह्याच दुष्काळात महाराष्ट्रातील अकोले नामे ग्रामीण तालुक्यात हरितक्रांती-धवलक्रांती आणि रोजगारहमी योजनेवर काम करणाऱ्या मजूर स्त्रीया-पुरुषांच्या तुटपुंज्या मिळकतीतून दिलेल्या दरडोई १ (एक रुपया) ने शैक्षणिक क्रांती घडवून आणली. गोरगरीब आदिवासी तसेच इतर गरीबांच्या मुला-मुलींसाठी सदा-सर्वदा बंद असलेले ज्ञानाचे कवाडे सताड उघडी झाली.

कोल्हार घोटी या रा.मा.४४ वरील अकोले शहरातून पश्चिमेकडे प्रवास करताना गर्द झाडीत वसलेले आणि त्यातच आकाशाला कवेत घेण्यासाठी आकाशाशी स्पर्धा करणारा गरुड हे डाव्या हाताला नजरेत भरणारे आणि सदैव स्मरणारे असे अगस्ति कॉलेज. आत प्रवेश केल्यावर प्रथम स्वागत करतो एक डांबरी रस्ता. त्याची वेस सांगते 'एज्युकेशनल कॅम्पस'. तब्बल १०० मी.चा डांबरी रस्ता. उजव्या हाताला पाण्याचा तलाव. डाव्या हाताला भव्य हँडबॉलचे मैदान. पुढे गेल्यावर भारदस्त शरीराचा माणूस असलेला चौकशी कक्ष (सुरक्षा कक्ष). तो पार करण्यासाठी कॉलेजचे ओळखपत्र कंपलसरी. पुढे डाव्या हाताला भव्य आणि अतिदिव्य अशी माझ्या कॉलेजची प्रशासकीय भवनाची त्रिकोणी इमारत व त्यावर आकाशात स्वच्छंद विहार करणारा भगवान विष्णूचा वाहक-गरुड. सर्व अप्रतिम. उजव्या हाताला दिल्लीतील आणि महाराष्ट्रातील लोकसभा, राज्यसभा संसदेत महाराष्ट्राचे प्रतिनिधीत्व करणाऱ्या कै. के. बी. दादा देशमुख यांच्या नावाचे सांस्कृतिक सभागृह. तेथेच जुनाट परंतु दणकट इमारत आजही आर्टस्-कॉमर्सच्या ज्ञानपिपासूंना ज्ञानदान करते आहे. डाव्या बाजूला पाण्याचे नळ, त्यातच डांबरी रस्त्याच्या डाव्या बाजूला सूचना फलकांचा भलामोठा बोर्ड. नेहमीच सुख-दुःख, स्पर्धा, परीक्षा, क्रीडा, बक्षिसे, शिबीरे यांची जाण देतो. समोर भोवताली नव्हे मध्यभागी

''रक्ताने लिहीली ज्यांनी बलिदानाची गाथा ।
सर्वप्रथम त्यांच्या चरणी विनम्र माझा माथा ।।''

अशा २६/११ च्या दहशतवादी हल्ल्यात तसेच आजपर्यंत देशाच्या रक्षणासाठी बलिदान अर्पण केलेल्या जवानांची सदैव आठवण करून देणारा पुतळा वा स्मारक. आजही साक्ष देतात, स्वाभिमान व बलिदानाची. समोरच 'आय,टी.' डिपार्टमेंट त्यावर भूगोल डिपार्टमेंट. तेथेच मागील बाजूस पुणे विद्यापीठात नव्हे तर महाराष्ट्रातील इतर विद्यापीठांत सर्वाधिक

''उगवत्या सूर्याला मावळावे लागते
बहरलेल्या फुलाला गळावे लागते,
पडलेल्या गारांना विरघळावे लागते,
आणि आठवणींना विसरून जगावेच लागते,
जगावेच लागते...''

महाविद्यालयीन युवकाच्या मनात अशा आठवणी येतात आणि क्षणात विरून जातात परंतु त्या सदा-सर्वदा सांगतात-

हे युवका तू अगस्तिच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या आणि त्याचेच नाव धारण केलेल्या : अगस्ति कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात शिकलास. होय ह्याच कॉलेजने तुला कधी हसवले, रुसवले, अडवले, दडवले आणि शेवटी एक उत्तम नागरिक म्हणून घडवले. अशा ह्या कॉलेजला माझा सर्वप्रथम सलाम!

राकट-रांगड्या, निसर्गसंपन्न वेली-वृक्षांनी नटलेला, डोंगर दऱ्या-खोऱ्यांनी वेढलेला, गिरीदुर्गाच्या सुरक्षेत, मुळा-प्रवरा ह्या नद्यांनी पावन केलेला संपूर्ण महाराष्ट्रात यांच्या शिरपेचातला एक आदिवासींचा मानाचा तुरा, असा अकोले तालुका. ह्याच अकोले तालुक्यात ज्ञानदान करणारे माझे तुमचे आणि उद्याच्या युवा पिढीचे हक्काचे अगस्ति महाविद्यालय.

'साहसे श्रीः प्रतिवसति।' खरोखर हे वाक्य किती समर्पक आहे. ह्या सुभाषितापुढे आकाशही ठेंगणे जणू. सन १९७२ मध्ये दुष्काळाने महाराष्ट्रातील मनुष्य,प्राणी, पक्षी, वनस्पती, डोंगर-दऱ्या, माती पाण्याविना कासाविस झाली होती. ह्याच दुष्काळात महाराष्ट्रातील अकोले नामे ग्रामीण तालुक्यात हरितक्रांती-धवलक्रांती आणि रोजगारहमी योजनेवर काम करणाऱ्या मजूर स्त्रीया-पुरुषांच्या तुटपुंज्या मिळकतीतून दिलेल्या दरडोई १ (एक रुपया) ने शैक्षणिक क्रांती घडवून आणली. गोरगरीब आदिवासी तसेच इतर गरीबांच्या मुला-मुलींसाठी सदा-सर्वदा बंद असलेले ज्ञानाचे कवाडे सताड उघडी झाली.

कोल्हार घोटी या रा.मा.४४ वरील अकोले शहरातून पश्चिमेकडे प्रवास करताना गर्द झाडीत वसलेले आणि त्यातच आकाशाला कवेत घेण्यासाठी आकाशाशी स्पर्धा करणारा गरुड हे डाव्या हाताला नजरेत भरणारे आणि सदैव स्मरणारे असे अगस्ति कॉलेज. आत प्रवेश केल्यावर प्रथम स्वागत करतो एक डांबरी रस्ता. त्याची वेस सांगते 'एज्युकेशनल कॅम्पस'. तब्बल १०० मी.चा डांबरी रस्ता. उजव्या हाताला पाण्याचा तलाव. डाव्या हाताला भव्य हँडबॉलचे मैदान. पुढे गेल्यावर भारदस्त शरीराचा माणूस असलेला चौकशी कक्ष (सुरक्षा कक्ष). तो पार करण्यासाठी कॉलेजचे ओळखपत्र कंपलसरी. पुढे डाव्या हाताला भव्य आणि अतिदिव्य अशी माझ्या कॉलेजची प्रशासकीय भवनाची त्रिकोणी इमारत व त्यावर आकाशात स्वच्छंद विहार करणारा भगवान विष्णूचा वाहक-गरुड. सर्व अप्रतिम. उजव्या हाताला दिल्लीतील आणि महाराष्ट्रातील लोकसभा, राज्यसभा संसदेत महाराष्ट्राचे प्रतिनिधीत्व करणाऱ्या कै. के. बी. दादा देशमुख यांच्या नावाचे सांस्कृतिक सभागृह. तेथेच जुनाट परंतु दणकट इमारत आजही आर्टस्-कॉमर्सच्या ज्ञानपिपासूंना ज्ञानदान करते आहे. डाव्या बाजूला पाण्याचे नळ, त्यातच डांबरी रस्त्याच्या डाव्या बाजूला सूचना फलकांचा भलामोठा बोर्ड. नेहमीच सुख-दुःख, स्पर्धा, परीक्षा, क्रीडा, बक्षिसे, शिबीरे यांची जाण देतो. समोर भोवताली नव्हे मध्यभागी

''रक्ताने लिहीली ज्यांनी बलिदानाची गाथा।
सर्वप्रथम त्यांच्या चरणी विनम्र माझा माथा ।।''

अशा २६/११ च्या दहशतवादी हल्ल्यात तसेच आजपर्यंत देशाच्या रक्षणासाठी बलिदान अर्पण केलेल्या जवानांची सदैव आठवण करून देणारा पुतळा वा स्मारक. आजही साक्ष देतात, स्वाभिमान व बलिदानाची. समोरच 'आय,टी.' डिपार्टमेंट त्यावर भूगोल डिपार्टमेंट. तेथेच मागील बाजूस पुणे विद्यापीठात नव्हे तर महाराष्ट्रातील इतर विद्यापीठांत सर्वाधिक काळ प्राचार्यपदाची धुरा समर्थपणे सांभाळणाऱ्या आमच्या लाडक्या, आदरणीय प्राचार्य रमेशचंद्र खांडगे सरांची भव्य अशी केबिन. आत प्रवेश केल्यावर आजी-माजी (भूतकालीन व वर्तमानकालीन) स्वातंत्र्यसैनिक नजरेत भरणारा स्वामी विवेकानंदांचा पुतळा. सर्व काही अद्‌भूतच शेजारीच भव्य कॉन्फरन्स हॉल. खाली येऊन समोर

## झुंज

प्रा. सुनील घनकुटे
( मराठी विभाग )

डोक्यावरच्या पिशीत ठेवलेली
गोड्या तेलाची अन् खोबऱ्या तेलाची शिशी
माय आजी
तेलणीकडं द्यायची.
बाजार सरल्यावर
वळीणं लावलेल्या
शिश्यांमधलीच
स्वत:ची शीशी काढून घ्यायची
आन् मग बायांचा घोळका वढ्यानं वर
गावाक निघायचा.
त्यान् मधी एकूलता एक
बाबू टुणटुण उड्या मारित निघायचा
दिवसभर आजा
शेतावर राबयचा
संध्याकाळी मातर तो
बाटली बरोबर जागायचा
जमीनीच्या इतभर तुकड्यावर
आज्याचं काळीज तिळतिळ तुटायचं
नांदत्या पोराबाळांच घर पाहून
त्याचं मन् आजुनच रडत सुटायचं
काय ल्यावं, काय घ्यावं
हाच त्याला भरम व्हता
निष्ठेनं जगणं हा
माझ्या आज्याचा धरम व्हता.
तालेवार आज्याला पाहून
गावानं आगळीक केली
फाटक्या कपड्यानीशी आज्याची नी बा ची
ज्यालात रवानगी केली.
घरात नव्हतं दानं
आनं पैकं बी नाही.
तव्हा चार वर्षाचा आसताना
साळत घालाईची केली घाई
माळावरच्या वाटावं,
भर पावसात भरल्या रानात,
आय हांबरडा फोडायची
आम्ही सगळी मंग सुरात सूर गायची.

## व्यथा सांगू कुणाला !

कु. ऋचा संकेत येलमामे
( ११ वी कला )

मन हे उधाण असते
कधी जल्लोषात रमते, तर कधी
आनंदात बहरत असते.
त्याला न कुणाची साथ
न कुणाची सोबत लागते
विचारे ! एकटेच आनंदात, कधी दु:खात
सामावत असते.

उधाण वाहणाऱ्या वाऱ्यासारखे इकडून तिकडे
बागडत असते.
वळणाच्या या वाटेवरून त्या वाटेवर झुलत असते.

तुडुंब गजबजलेल्या या शहरांमध्ये कुठेतरी आपणास
शोधत असते.
का ? कधी ? कोणास ठाऊक नव्हते या मनाला
कुणाची साथ हवी असते.

त्याची ही वणवण का कुणाच्या डोक्यात घुसत नसते
तरीही ते आनंदाने बागडत असते
दु:ख सोसण्या-पलिकडे त्याच्याकडे काहीही उरलेले
नसते.
परंतु दु:ख विसरून हसणे त्याला भागच असते

मनाच्या व्यथा ना तो सांगू शकला
ना त्या भावना लपून राहू शकल्या
म्हणूनच तो जगात मोकळेपणाने वावरु शकला.

## चला ना... राजे, तुम्हाला तुमचा महाराष्ट्र दाखवतो.

प्रदीप अरविंद देशमुख
( टी.वाय.बी.एस्सी, केमेस्ट्री )

चला ना... राजे,
तुम्हाला तुमचा महाराष्ट्र दाखवतो
काय ते तुमचे मावळे होते
जे लढले रयतेसाठी, अन्
काय ते विजयी सोहळे होते जे सजले
राजमातेसाठी,
पण, आज तुमचाच मावळा
दोन दोन गर्लफ्रेंड वागवतो
अन् पाण्याची तहान बीअरवर भागवतो.
चला ना... राजे,
तुम्हाला तुमचा महाराष्ट्र दाखवतो
घरी बाप आत्महत्या करून मरतो
तरी तुमचा मावळा दारु मटनाच्या
पार्टीसाठी झुरतो.
राजकारण्यांची धुणी भांडी करतांना त्याचा
आत्मा तरी कुठे दुखावतो
बघा ना राजे,
तुमचा मावळा स्वाभिमानाच्या नावाखाली
मान झुकवतो
चला ना... राजे,
तुम्हाला तुमचा महाराष्ट्र दाखवतो
भगव्याच्या नावाखाली आमदार खासदार
आज कैक झाले
मावळे म्हणवतात आता त्यांचे चेले
त्यांचाही डोळा आता पक्षाचा झेंडा
पाहुनच सुखावतो
म्हणून सह्याद्रीच्या कड्याकडे हिमालय डोळे
वटारून पाहतो,
चला ना... राजे,
तुम्हाला तुमचा महाराष्ट्र दाखवतो
रयतेच्या मदतीसाठी दारात येऊन जे भिक मागतात
तेच पुढची पाच वर्षे मग रयतेच्या डोक्यावर नाचतात.
गाडी झाली, बंगला झाला तरी
त्यांना पैशाचा माज सोकावतो इथे
राजकारण्यांच्या कृपेने भ्रष्टाचार कसा फोफावतो,
चला ना... राजे,
तुम्हाला तुमचा महाराष्ट्र दाखवतो
विसरले परंपरा अन्
पराक्रमाची कुठे आता भाषा नाही
तुमच्या मावळ्यांना इतिहासाची आता ती
नशा नाही
वर्गणीच्या पैशाने एकदा मिरवणूक काढून उगाच
फुशारकी मिरवतो
सह्याद्रीच्या कड्यावर
फिरणारा आता पब मध्ये मस्ती जिरवतो
चला ना... राजे,
तुम्हाला तुमचा महाराष्ट्र दाखवतो...

---

## आपणही कधीतरी

कु. जयश्री रंगनाथ वायळ
(एफ.वाय.बी.कॉम.)

गुलाबाच्या फुलासारखं आपणही,
कधी तरी फुलावं.
प्रेमाच्या सुगंधाने सर्वांना,
आपलसं करावं
चंद्रासारखं शीतल आपणही,
कधी तरी व्हावं
कोमल स्पर्शाने सर्वांना जवळ करावं,
कोकिळा सारखं गीत आपणही,
कधी तरी गावं
मंजुळ स्वरांनी सर्वांना,
मंत्रमुग्ध करावं.
मैत्रीच्या आठवणीने आपणही,
व्याकुळ व्हावं.
त्या आठवणीनं आपलं,
जीवन सजवावं.

## बायकांचं बरं असतं

कु. वैशाली शांताराम कानवडे
(एम.ए.-१, इंग्लिश)

म्हणतात, बायकांचं मात्र बरं असतं ।
साऱ्यांनी तिला गृहित धरायचं असतं
तिला कमविण्याचा विचार करायचे कारण नसते
कमविलेच तर खर्च करायचे स्वातंत्र्य नसते
नवरा म्हणेल त्या चित्राला मत द्यायचं असतं
त्या चित्रातल्या उमेदवाराबद्दल काय देणं घेणं नसतं
निवडून कोणीही येवो काही सोयरसुतक नसतं
तरी म्हणतात, बायकांचं मात्र बरं असतं ।।
नवरा म्हणाला तर निवडणुकीला उभं रहायचं असतं
पक्षाच्या अजेंड्याशी काय देणं घेणं नसतं
हे म्हणतील तिथं सहीचं बोट टेकवायचं असतं
तरी म्हणतात, बायकांचं मात्र बरं असतं ।।
नवरा हेच बायकांचं केंद्रस्थान असतं
विरोधी पक्षाच्या बाकावर सासूबाईचं स्थान अढळ असतं
त्यांच्या मदतीला अपक्ष उमेदवार नणंदेचं पद नेहमीच असतं
तरी म्हणतात, बायकांचं मात्र बरं असतं ।।
मनात धगधगता ज्वालामुखी ठेवुन
वर हसतमुख रहायचं असतं
कारण घरची लक्ष्मी म्हणून तिच्याकडे पहायचं असतं
मात्र घरात काही अभद्र घडलं
तर पांढऱ्या पायाची म्हणून तिला बोलायचं असतं
तरी म्हणतात, बायकांचं मात्र बरं असतं ।।
हुंडाबळी बनून जळायचं असतं
विधवा परिक्तेचं जीणं जगताना तर
मृत्यूशिवाय जवळचं कोणी नसतं
तरी म्हणतात, बायकांच मात्र बरं असतं
मुलगी बनून वडिलांसमोर नंदीबैल व्हायचं असतं
बायको म्हणून नवऱ्याचं व्यसन, बरं वाईट सारं
सोसायचं असतं
आई बनून म्हातारपणी मुलांपासून दूर वृद्धाश्रमात रहायचं असतं
तरी म्हणतात, बायकांचं मात्र बरं असतं

## स्त्री... !

नीलम नागरे
(एम.ए. मराठी)

ती कुणाच्या अध्यातही नव्हती
ती कुणाच्या मध्यातही नव्हती पण;
का वेळोवळी तिची कुचंबना होत होती ?

न केलेल्या गुन्ह्याची शिक्षा तिला
का म्हणून मिळत होती ? का ?
ती एक स्त्री म्हणून अशी वागणूक
तिला मिळत होती ?

तिच्या हृदयात एक ज्योत भडकू
लागली होती ! विद्रोहाची खरी
भूमिका आता तिने घेतली होती !

तिच्या जगण्याची आता सुरुवात
झाली होती ! तळपत्या तलवारीला
आता धार आली होती !

तिची तक्रार कुणाशीही नव्हती !
परिस्थिती आजची कालची नाही,
तर न-जाणे कित्येक जन्माची
होती ! अंधारातही शोध घेणारी
उजेडाची होती !

बेधुंद नशा तिच्या मनावर चढली
होती ! आता मात्र माघार ती काही
केल्या घेणार नव्हती !

स्वअस्तित्वाने ती आता प्रत्येक
क्षणी स्वत:ला नव्याने शोधणार
होती! साथ तिला मन, मनगट
आणि मेंदूने बनवलेल्या शिक्षणाची
होती!

## माघार घेवू नकोस

गायकवाड प्रतिभा प्रभाकर
(एस.वाय.बी.कॉम.)

जेव्हा तुला अनंत अडचणी येतील
जेव्हा तुझा मार्ग अत्यंत खडतर असेल
जेव्हा तुझ्या अपेक्षा जास्त असतील
व तुला पाहिजे तसे यश मिळत नसेल

जेव्हा तुला हसायचे असेल परंतु रडावे लागत असेल
जेव्हा तुला चिंतेने ग्रासलेले असेल
तेव्हा तू थोडा विसावा घे, पण माघार घेऊ नकोस
जीवन चढ-उतारांनी भरलेले आहे. हे विसरू नकोस

जेव्हा तू काही मिळविण्यासाठी परिश्रम करत असशील
तेव्हा कधी-कधी अपयशही येईल
पण तू प्रयत्न करणे सोडलेच नाहीस
तर तुझा विजय निश्चित आहे.

यश खूप दूर आहे असे जेव्हा आपल्याला वाटते
तेव्हा ते खूप जवळही असू शकते
जेव्हा तू प्रतिकूल परिस्थितीशी झगडत असशील
तेव्हा तू खरेच प्रयत्न करणे मात्र सोडू नकोस

प्रयत्नांनीच तुला थकवा येईल
तेव्हा थोडा 'विसावा' घे; पण माघार घेऊ नकोस
अजिबातच माघार घेऊ नकोस ...

येणाऱ्या सर्व आव्हानांसाठी सज्ज रहा
त्यांना खंबीर मनाने सामोरे जा
ऐरण झाल्यास घाव सोस
हातोडा झालास तर घाव घाल !

## फुलपाखरु

प्रदीप अरविंद देशमुख
(टी.वाय.बी.एस्सी.)

पावसानंतर वेलीवरती,
जेव्हा एक कळी उमलते,
हळुवार प्रकाश स्पर्शाने
तीचे नाजूक फूल बनते ।।१।।

फूल खूप सुंदर दिसते
जेव्हा ते फुलते
फुलपाखरु खूप गोड हसते
जेव्हा ते फुलावर बसते ।।२।।

काही क्षणांच्या भेटीनंतर
मंद वाऱ्याची झुळूक वाहते,
फुलासोबत फुलपाखरु देखील
वाऱ्यावरती डूलू लागते ।।३।।

जशी दिवसानंतर रात्र
येतच असते
तसे दुःखानंतर सुखही
येतच असते ।।४।।

आपले आयुष्य देखिल
असेच असते,
फुलासोबत एक दिवस
फुलपाखरु देखिल नाहीसे होते ।।धृ।।

# आयुष्य विणायला घेऊ या

भालेराव आदिती आनंद
(टी.वाय.बी.कॉम.)

आज म्हटलं आयुष्य विणायला घेऊया
जमतंय का ते बघूया
वाटलं अगदी सोपं असेल !
रंगसंगती जमून आली की आयुष्यही सुंदर दिसेल !
प्रश्न पडला धागे कोणकोणते घ्यायचे
एक दोनच की सगळेच वापरायचे !
मग ठरवलं फक्त छान–छानच धागे घेऊ
एक काय दोन काय सगळेच एकमेकांत विणू !
सुरूवात केली वात्सल्याच्या धाग्याने
धागा होता फार उबदार आणि मुलायम
म्हटलं छान आहे हा धागा
धाग्याने ह्या विण राहिल कायम !
मग घेतला मैत्रीचा धागा
म्हणता म्हणता बऱ्याच भरल्या जागा
थोडं थोडं आयुष्य आकार घेऊ लागलेलं
पण अजुनही बरचंस विणायचं बाकी
राहिलेलं !
एक एक धागा आशेचा,
सुखाचा आणि आनंदाचा घेतला
प्रत्येक धाग्यात तो आपसुकच गुंफत गेला !
हळूहळू विण घट्ट होत होती
तरी देखील कसली तरी कमी मात्र होती !
मग घेतला एक प्रेमाचा धागा
धागा होता सुंदर आणि रेशमी
धाग्याने त्या आयुष्याला
अर्थ आला लागुनी !

एक एक घेतला धागा
यशाचा, किर्तिचा आणि अस्तित्वाचा
आयुष्याला त्यामुळे एक नवा
उद्देश मिळाला !
सगळेच धागे सुंदर, छान आणि प्रसन्न होते !
तरी देखील त्यांच्यातल्या एकसारखेपणाने मन
मात्र खिन्न होते !
थोडे धागे पडले होते
निवांत बसून असेच !
म्हटलं बघुया तरी ह्यांच्यामुळे
आयुष्य होतय का सुरेख
मग घेतला एक धागा दुःखाचा एक निराशेचा
एक धागा अपयशाचा आणि
एक धागा पराजयाचा !
हे चारही धागे विणता एकमेकांमध्ये
आयुष्याला खरा अर्थ लाभला त्यांच्यामुळे !
अपयशाशिवाय यश नाही
दुःखाशिवाय सुख नाही !
पराजयाशिवाय जय नाही
आणि निराशेशिवाय आशा नाही !

## देशासाठी लढला म्हणून...

रणजीत भांगरे
(एस.वाय.बी.ए.)



मी जन्म घेतला देशासाठी काही तरी करायचे म्हणून,
मोठेपण मिळविण्यापेक्षा देशासाठी लढायचे म्हणून
शिकता-शिकता खूप शिकलो भारत भूमिला शिखरावरती न्यायचं म्हणून
पाहता पाहता सैन्यात दाखल झालो,
तिरंग्याला वंदन करायचे म्हणून,
आई-वडिलांची आठवण येत होती मनात दाटून
पण देशासाठी आलो त्यांना दूरवर सोडून
देशासाठी लढता-लढता देवाने नेले दूर
शहीद झाला सचिन असे मायभूमिला सांगून
(माजी विद्यार्थी)

## अंधश्रदधा

सागर सुधाकर भांगरे
( टी.वाय.बी.कॉम.)

क्रांतीवीर होवून गेले, या भूमिवर जन्मले
त्यांनी जनजीवन फुलवले गं, शेजारीन सखेबाई – १

पोरगं झालं म्हणून आनंदी, पोरगी झाल्यानं होताय दुःखी
सांगा कोण बांधील राखी गं, शेजारीन सखेबाई – २

देव अंगात येवून उडं, मागतया बकरं कोंबडं
अंधश्रद्धेवर टाका घोंगडं गं, शेजारीन सखेबाई – ३

मांत्रिक कमावतात फार, गरीब विकतात घरदार
हेच खरे चोर गं, शेजारीन सखेबाई – ४

घेतात अंगात वारं, द्या बळी म्हणे नर
यांना द्यावा पब्लिकनं मार गं, शेजारीन सखेबाई – ५

तुम्ही घेता फायद्याची संधी, त्यामुळे मुलींची मंदी
साऱ्या मुलांची झाली वांदी गं, शेजारीन सखेबाई – ६

मांत्रिक देतात आमंत्रण, गरीब स्वीकारतो निमंत्रण
झाले फाटक्या संसाराचे कात्रण गं, शेजारीन सखेबाई – ७

तुम्हाला करतो मी विनंती, अंधश्रद्धेची करा हो मुक्ती
त्याने सारेजण सुखानं नांदतील हो, शेजारीन सखेबाई – ८

तुम्हाला सांगतो मी शेवटी, अंधश्रद्धेची करा हो शेकोटी
थांबवा ही लाय-लाटी गं, शेजारीन सखेबाई – ९

## स्वप्न

फापाळे प्रांजली भास्कर
(१२ वी (वाणिज्य))

सगळ्याच गोष्टी
सांगायच्या नसतात
सगळेच अश्रू
दाबायचे नसतात
सगळ्याच नात्यांना
नावं द्यायची नसतात
स्वप्न पूर्ण होत नाहीत
म्हणून ती पाहणं
सोडून द्यायची नसतात
ती मनाच्या एका कोपऱ्यात
जपायची असतात ....

## अर्थ जगण्याचा

फापाळे प्रांजली भास्कर
(१२ वी (वाणिज्य))

तो फक्त एक भास होता
आभासी जगात वावरण्याचा
ढासळलाच तोल चालता चालता
तर आकस्मिकतेने सावरण्याचा ....
आज वाट बदलली, दिशा बदललल्या
पण प्रवास मात्र तसाच चालू
हारुन पुन्हा जिंकण्याचा
असंच काही सुखांना मुकावं लागलं ...
पण डोळ्यांना कधीच थकवा नाही आला
विस्कटलेली स्वप्ने पुन्हा पाहण्याचा
जगण्याचा शोध घेता घेता
आयुष्यच संपत आलं
मरणातील दुःख तर कळलं, पण....
कधीच नाही कळला
अर्थ जगण्याचा !! अर्थ जगण्याचा!!

## हेच तर खरं वय असतं

कु. निर्मला वसंत नवले
( एस.वाय.बी.कॉम. )

किती दिवस असं आईबापाच्या
जिवावर फुकट बसून खायचं
अंगात एवढं बळ असताना
घरात लोळत बसायचं
आजूबाजूच्या अनाड पोरांबरोबर
बाहेर उनाडक्या करत फिरायचं
आणि रोज नव्या खोड्या काढून
काळं तोंडाला फासायचं
अभ्यास कर म्हटलं की
तोंड वाकडं करायचं
कितीही कोणी काहीही बोललं
की निर्लजपणे हसायचं
का म्हणून मित्रांनो आपल्या नशीबी
इतकं वाईट दिवस आणायचं
मनासारखे मार्क मिळत नाही
हे कारण रोज सांगायचं
पण,
आयुष्यात काहीतरी करून दाखवायचं
हेच तर खर वय असतं
कारण
वेळ निघून गेल्यावर
सर्वच काही फसतं
सर्वच काही फसतं

## प्रतिज्ञा

जोरवर वृषाली दत्तात्रय
(टी.वाय.बी.सी.एस.)

कम्प्युटर माझा मित्र आहे
कम्प्युटर शिकणारे सारे विद्यार्थी माझे बांधव आहेत.
माझ्या कम्प्युटरवर माझे प्रेम आहे
माझ्या कम्प्युटरमधल्या आधुनिकतेने आणि विविधतेने
नटलेल्या तंत्रज्ञानाचा मला अभिमान आहे.
त्या तंत्रज्ञानाचा पाईक होण्याची पात्रता माझ्या अंगी
यावी म्हणून मी सदैव प्रयत्न करीन.
कम्प्युटर शिकून मी माझ्या पालकांचा सन्मान वाढवीन
आणि गुरुजनांच्या मार्गदर्शनाखाली कम्प्युटरचे सखोल ज्ञान घेईल.
माझा देश आणि माझे देशबांधव यांना कम्प्युटरचे
फायदे समजावून सांगण्याची मी प्रतिज्ञा करीत आहे.
आधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने सर्वांचे कल्याण आणि
सर्वांची समृद्धी यातच माझे व देशाचे सौख्य सामावले आहे.
''आधुनिक शिक्षणाची नवी थीम .....
की बोर्ड, माऊस, कम्प्युटर स्क्रीन ...''

## जीवन

कु. अश्विनी नामदेव पवार
(एस.वाय.बी.एस्सी.)

दुःखाला सामोरे जाण्यातच खरं कौशल्य असतं
त्याच जमिनीवर राहून आकाशात उडायचं असतं
आपल्या मनासारखं कधीच घडत नसतं.
हीच माझी ओळख, असं नशीब म्हणत असतं.
ऊन एकटं कधीच येत नाही, ते सावलीला घेऊनच येतं
फक्त सावलीला प्रगट व्हायला झाडाचं अस्थित्व लागतं
चांदण्याला महत्त्व अंधारामुळेच येतं
दुःखाचं आणि सुखाचं हेच नातं असतं
दुःखच नसेल आयुष्यात तर आयुष्याची मजा घेता येईल का ?
ओलं न होता, कधी तरी पावसात भिजता येईल का ?

## आई ! मला जन्म घेऊ दे !

कु. अंजली सुखदेव वाकचौरे
(एस.वाय.बी.सी.ए.)

तू जसे पाहिले जग मला देखील पाहू दे
नको मारू आई मला जन्म हा घेऊ दे !
परमेश्वर प्रत्येकाच्या घरी जाऊ शकत नाही,
त्याच्या जागी तू आहेस कसे तुला कळत नाही
ताईसवे माझ्या मला आनंदाने न्हाऊ दे,
नको मारु आई मला जन्म हा घेऊ दे !
हुंडा लागतो मोठा म्हणून त्रास माझा वाटतो का
झरा तुझ्या मायेचा म्हणून असा आटतो का ?
राखीसाठी दादाच्या निदान मला येऊ दे,
तू बहीण, तू कन्या, तू एक स्त्री आहे,
काल जिथे तू होती, आज तिथे मी आहे,
तू जसे विणले नाते तसे मलाही विणू दे...
नको मारू आई मला जन्म हा घेऊ दे !
पहा मग फिरून मी पुन्हा कधी येणार नाही,
भाग्य कन्यादानाचे आई तुला देणार नाही,
डोळे येता भरून तुझे पदर मला होऊ दे,
नको मारु आई मला जन्म हा घेऊ दे !

## शब्द

कु. भोर ज्योती भानुदास
(एफ.वाय.बी.कॉम.)

बोलताना जरा सांभाळून
शब्दाला तलवारीपेक्षा जास्तंच धार असते.
फरक इतकाच की तलवारीने मान
तर शब्दांनी मन कापले जाते.
जरी तलवारीच्या जखमेतून रक्त आणि
शब्दांच्या जखमेतून अश्रू येत असले तरी
दोघांपासून होणारी वेदना मात्र सारखीच असते.
शब्दाला जास्तच धार असते
बोलताना जरा सांभाळून

## विश्वकल्याण मानवता सुविचार

बाबाजी बाळासाहेब रंधे
( एफ.वाय.बी.एस्सी. 'बी' )

सरळ मार्ग सोडून माणसा, काट्याने तू जाऊ नको.
ज्या संगतीने दुर्गूण वाढे, संगत त्याची धरु नको.
संसारामध्ये गुंग होऊनी, भोग विलासी बनू नको.
द्वारी तुझिया आला भिकारी, विन्मुख त्याला लावू नको.
गरीब–दुःखी–अंध–पंगूंना, सहाय्य करण्या चुकू नको.
कर्ज कुणाचे बुडवू नको रे, ठेव कुणाची दाबू नको.
गहाण कुणाचे डुबवू नको रे, कधी रिकामा बसू नको.
न्याय नीतीने मिळवी पैसा,अनीतीने तू कमवू नको.
श्रीमंतीची वेळ आली तरी, भलते–सलते बोलू नको.
बोल तयाचे तुझ्या हिताचे, झिडकारुनी तू लावू नको.
बालपणी ते कष्ट सोसले, जाणीव त्यांची विसरू नको.
निंदा नालस्ती करू नको रे, मने तयांची दुखवू नको.
माता–पिता हे दैवत समजूनी, पूजा करण्या लाजू नको.
आशीर्वाद तू घेण्यासाठी, शरम कुणाची धरु नको.
परनारीया माता भगिनी, पाप वासना धरू नको.
वेश्येला तू जवळ बसवूनि, पतिव्रतेला छळू नको.
विद्यार्थ्यांनो गुरुजनांना, कमी प्रतीचे लेखू नका.
विद्या शिकवूनी मनुष्य बनविती, जाणीव त्यांची विसरू नका.
अंगी नम्रता सदा असावी, कोणा संगे भांडू नको.
चोरी कुणाची करू नकोरे, अबला दुःखी करू नको.
चहाडी चुगली करूनी माणसा, फुट कुणामध्ये पाडू नको.
स्वार्थाकरिता तंटे लावूनी, गंमत त्यांची पाहू नको.
न्यायासनावर बसुनि माणसा, खोटा न्याय तू देऊ नको.
नोकरी कुणाची करी परंतु, सत्य बोलणे तू सोडू नको.
सट्टा, लॉटरी, जुगार, मटका नशेचा खेळ खेळू नको.
मद्यपान व मांसाहार तू, कधीही सेवन करू नको.
हे मी केले ते मी केले, गर्वाने तू बोलू नको.
क्षणार्धामध्ये उलथून पाडील, प्रभूलीला तू विसरू नको.
नर जन्माला येऊन प्राण्या, प्रभू स्मरणाला कधी विसरू नको.

## आम्हाला पुढंच जायचंय

राहुल बबन डोंगरे
( टी.वाय.बी.एस्सी., रसायनशास्त्र )

कशाची भीती अन् कशाचं काय
कुणालाच आम्ही डरणार नाय
ध्येय डोळ्यापुढं एकच हाय
कष्टाचं आणि घामाचं
दाम आम्हा मिळणार हाय
आम्हास्नी पुढंच जायचं हाय
ज्ञानाची पताका घेऊन खांद्यावर
उंच भरारी मारायची हाय
कुणाची पर्वा करायची नाय
सर्वांना एकजुटीने बरोबर घेऊन
पुढंच चालायचं हाय
आम्हास्नी पुढंच जायचं हाय
एकीच्या बळाचं सुकाणु हाती धरलयं
नवक्रांतीचं वारं मनी भरलंय
वाऱ्याच्या दिशेने जायचं हाय
मोठमोठ्या लाटांना तुडवायचं हाय
अन यशाचा किनारा, गाठायचा हाय
आम्हास्नी पुढंच जायचं हाय
नव तरूण युवक या देशाचे
पांग फेडू भारत भू चे
अज्ञानांना सज्ञानाचा मार्ग दावायचा हाय
एकविसाव्या शतकाकडे आगेकूच करण्याचा
नवचैतन्याचा बहार फुलवायचा हाय
आम्हासनी पुढं–पुढंच चालायच हाय.

## मी

तौफिक आरिफ शेख
( टी.वाय.बी.कॉम )

शब्दा-शब्दांच्या या खेळात कधी पुढे गेलो
समजलेच नाही.... आणि
जेव्हा समजले, तेव्हा शब्दाचे अर्थ उमजलेच नाही
आयुष्य असच असतं...
जवळ सर्व काही असतं.
पण पुन्हा नवीन काहितरी हवं असतं
अस म्हणतात ना... दिसतं तसं नसतं
म्हणून तर जग फसतं
आणि या जगात मी पण फसलो...!
दुःखाच्या डोंगरावर एकांतात जाऊन बसलो.
आणि नकळत का होईना...
मी माझ्यावर रुसलो...!

## मुलींनी कसे वागावे ?

कु. सीमा भरत झोडगे
(एस.वाय.बी.सी.ए.)

मनमोकळेपणाने समाजात वागले तर,
म्हणतात पोरीला घरबंधन नाही
शांतधीर गंभीरपणे वावरले तर
म्हणतात बोलण्याची सवय नाही
लवकर लग्न केले तर म्हणतात
एखाद्याचे लफडे लपवायचे असेल
लग्नाला उशीर होत असेल तर
म्हणतात मुलीला एखादी खोड असेल
खूप शिकलेली असेल तर म्हणतात
काय कामाची ? डोक्यावर बसेल
मित्र मैत्रिणी जास्त असतील तर
म्हणतात टवाळखोर असेल
मित्र मंडळी कमी असेल तर
म्हणतात एकलकोंडी असेल
मुलींनी या दुतोंडी जीवनात जगावे कसे
निरपराधी असताना छोट्या-लहानाला
घाबरुन मरावे तरी कसे

## रोज

कु. सुप्रिया नामदेव पवार
( एस.वाय.बी.सी.ए. )

रोज रोज दिवस नवा
जसा पाखरांचा थवा
तोच सूर्य तोच चंद्र
तरी भासे मनी नवा
रोज नवखीच पहाट
रोज नवखा तो संकल्प
रोजचीच सुख-दुःखे
नवखेच बहुरुप
रोज पाने फुले डोले
रोज पक्षी किलबिले
पालवीच्या त्या शेंड्याला
नाजूक ते फूल डोले
रोजचाच पूजा पाठ
तीच गुरुशिष्य नाती
ह्याच नात्यातून पुढे
निपजती खरे मोती

## सुख-दुःख

कु. शिवांजली भाऊसाहेब नवले
(टी.वाय.बी.बी.ए.)

काय झाले ते कळेना
जीवन काय ते समजेना
जीवनाच्या वाटेवर किती
सोबती मिळाले पण,
माझे कोण तेच कळेना.
शोधतेय मी पण एका
जीवनाच्या चांदण्या रातीत
पण जीवनाचं चांदण आकाश
कुठे हरवलय तेच कळेना.
खरचं, जीवनात रस्ते
असच वळण घेतात
ज्यांना जीवापलीकडे जपले
मात्र तेच सोडून जातात...

## लग्न

कु. सय्यद आयेशा इम्रान
(एस.वाय.बी.ए.)

माझी आजी सांगायची
तिच्या लग्नाची कहानी
आमच्या काळी 'लग्न'
आठ-आठ दिवस चालायची
पाच-पंचवीस माणसे अहोरात्र खपायची,
पाहुण्यांच्या दिमतीला.
ती लाजत सांगायची कशी,
मी त्यांना पाहिलं पुसटसं, सप्तपदीच्या वेळी
लाजत, मुरकत, नऊवारीचा घोळ सावरत,
पायात पैंजण, नाकात नथ
पेलवत नव्हतं सारं,
पण ठेक्यानं मजा यायची
पुढं माझा ठेका, चुकलाच नाही.
याच ठेक्यात जाडशील पावलानं फिरत राहिले
स्वयंपाक घरातून माजघरात,
अन् माजघरातून स्वयंपाक घरात
एखाद्या सम्राज्ञीसारखी.

आता माझी आजी नाहीये
आता आई सांगते
माझं लग्न झालं, दोन दिवसात
तुझ्या बाबांना मी पूर्वीच पाहीलं होतं
मोजकीच माणसं बोलावली
बरेच जन रुसले
पण काही-बाही सांगून, त्यांची केली बोळवण
सप्तपदी आवरुन घेतली गडबडीत
माझ्या पायात पैंजण नाही, तोरड्या होत्या.
किणकिण मंजुळ वाजायच्या,
त्यांच्या तोलातच चालायचे,
स्वयंपाक घरातून माजघरात
अन् माजघरातून ओसरीवर
कोण आलं-गेलं बघायची.
आता 'ती' नाहीये
आता मी माझ्या मुलीला सांगते,
माझ्या लग्नाची कहाणी
तुझ्या बाबांना वेळच नव्हता
म्हणून लग्न नोंदणी पद्धतीनं केलं
लग्न झाल्याची वार्ता,
कळली साऱ्यांना महिन्यांनी
लग्न आमचं आम्हीच केलं
रुसव्या फूगव्याचा प्रश्नच नाही आला.
माझी कारकीर्द संपली
आता माझ्या मुलीनं लग्न ठरवलंय
अन् केलही तिचं तिनं
'इंटरनेटवर'
लग्नासाठी वेळ नाही दोघांनाही
रिसेप्शन मात्र दिलं दणक्यात
मुलीनं 'भारतात' अन् जावयानं 'अमेरिकेत' !

## आठवणी

कु. निसळ श्रीकांत सुनील
(एफ.वाय., बी.एस्सी.)

आठवणी ओठावर हासू आणतात
आठवणी डोळ्यात आसू आणतात
कधी गर्दीत मनाला एकटे करतात तर,
कधी एकटे असताना मनात गर्दी करतात
आयुष्य नेहमीच दुसऱ्यांसाठी जगावं लागतं
आपलं सुख वाटून,
दुसऱ्यांचं दु:ख कमी करावं लागतं
मोती सुद्धा मौल्यवान बनतो
पण त्यासाठी शिंपल्यात जगावं लागतं
मोर नाचताना सुद्धा रडतो,
आणि राजहंस मरताना सुद्धा गातो,
दु:खाच्या रात्री झोप कुणालाच लागत

## झाडाचं मनोगत

कु. अजीत रमेश पवार
(टा.वाय.बी.ए.)

हे मानवा कृपा करुन विसरु नकोस....
हिवाळयातील तुझ्या शेकोटीची उब मी आहे.
उन्हाळयातील तुझ्या डोक्यावरील छाया मी आहे.
माझी फळे प्रवासात तुझी भूक भागवतात.
त्यांचा रस तुझा सुकलेला घसा ओलावतात.
तुझ्या घराचा खांब मी आहे.
तुझ्या छपराची तुळई मी आहे.
नदी नाल्यातून नेणारी तुझी होडी मी आहे.
विश्रांती देणारा तुझा पलंग मी आहे.
मी तुझ्या कुदळीचा दांडा आहे.
नांगराचा फाळ आहे.
गाडीचं चाक आहे.
पाळण्यात तुला जोजवणारा मीच होतो
आणि ....
स्वर्गाच्या स्वारीचे वाहनही मीच असणार आहे.

## बळीराजा

प्रा. वंदना जालिंदर भाग्यवंत
(मराठी विभाग)

आज अचानक किमया झाली
पीक तरारले शेतामधी
असे घडले नव्हते कधी
भरजरी नेसून हिरवा शालू
पांघरला तिने सभोवरी
काळ्या आईचं हे देखणं रुप
पाहुनी हरखले मी मनी
गहु, हरभरा, ज्वारी, बाजरी
पीकं डोलती वाऱ्यावरती
अन् गाणं गाते कणाकणांतुनी
या भूईनं दिलं दान पसाभर तरी
सरणार नाही वर्षभरी
पावसाच्या या वरदानाने
सुखावला बळीराजा घरोघरी
नदी, नाले तुडूंब भरती
वरुणराजाच्या कृपेने सारे घडती
अशीच किमया सदा घडावी
बळीराजा माझा व्हावा सुखी

## जबाबदार कोण?

प्रा. वंदना जालिंदर भाग्यवंत
(मराठी विभाग)

एकदा पाऊस खूप थकला
आणि घरात जाऊन बसला
म्हणाला, मी नाही जात
कारण मला भरलाय ताप
पाऊस म्हणाला, मी दरवर्षी कोसळतो
तेव्हा सर्वजण होतात आनंदी
उशीर केला तर
का सगळेच दु:खी
मलाही वाटतं, नको तो
विजेचा कडकडाट,
ढगांचा गडगडाट
अन् नको ते धरतीवर बरसणं
एखाद्या वर्षी गुडूप होणं
मलाही आवडतं
नाहीतर रुद्रावतार धारण करणं
तुम्हाला त्रासदायक ठरतं
मी असा का वागतो
ते तुम्हीच ठरवा
माझ्या वागण्याला जबाबदार
कोण ते मला सांगा?

# वाणिज्य महोत्सव



महोत्सवाचे उद्घाटन करतांना तहसिलदार मा. चंद्रशेखर देशमुख
सोबत संस्थेचे अध्यक्ष मा. जे. डी. आंबरे पा., प्राचार्य रमेशचंद्र खांडगे



कॅन्सर सबंधी जनजागृतीपर उद्बोधन करतांना
ग्लोबल व्हीजन कॅन्सर केअर, पुणे च्या कु. राणी गुप्ता



रामबंधु मसालेचे अध्यक्ष मा. हेमंतजी राठी यांचे उत्पादन व विपणन
या विषयावर मार्गदर्शन



वरिष्ठ महाविद्यालय मिस्टर कॉमर्स व मिस कॉमर्स अनुक्रमे
श्रीकांत वाकचौरे व कु. वृषाली धुमाळ



कनिष्ठ महाविद्यालय मिस्टर कॉमर्स व मिस कॉमर्सचा पुरस्कार स्विकारतांना
अनुक्रमे पराग हुलवळे व कु. सोनाली आवारी



बेस्ट स्टुडंट ऑफ कॉमर्स पुरस्कार अध्यक्ष मा. जे.डी. आंबरे पाटील यांचे हस्ते
स्विकारतांना शुभम मनियार

# अगस्ति कला, वाणिज्य व दादासाहेब रुपवते विज्ञान महाविद्यालय, अकोले

## विविध उपक्रम



सहल: कॉमर्स विभाग



सहल: केळुंगण वृध्दाश्रम भेट




सहल: मराठी विभाग



सहल: वनस्पतीशास्त्र विभागाची कळसुबाई शिखर भेट





नर्मदा प्रकल्पग्रस्तांना अकोले शहरातून गृहउपयोगी साहित्याची मदत



पर्यावरण: महाविद्यालय परिसरात कडक उन्हाळ्यात पक्ष्यांसाठी अन्न, निवारा व पाण्याची सोय



पर्यावरण: तीव्र उन्हाळ्यात कृत्रिम पाणीसाठ्यातील पाणी पिऊन आपली तहान भागवतांना

# आमचा मान आमचा सन्मान

**ह.भ.प.डॉ. लहवीतकर महाराज यांचे हस्ते**
**पीएच.डी. प्राप्त प्राध्यापक व गुणवंतांचा सत्कार समारंभ**



प्रा.डॉ. अशोक दातीर (भौतिकशास्त्र)



प्रा.डॉ.सौ. रंजना कदम (मराठी)




प्रा.डॉ. विजय काळे (मराठी)



प्रा.डॉ. नितिन आरोटे (राज्यशास्त्र)



श्री. प्रवीण घुले (गुणवंत शिक्षकेतर कर्मचारी पुरस्कार २०१४)



श्रीकृष्ण भांगरे (आर.डी.सी. परेड, नवी दिल्ली)

## विविध उपक्रम



**नारी मंच उद्घाटन समारंभः**
उद्घाटन करतांना प्रमुख पाहुणे ह.भ.प. ज्ञानेश्वर माऊली वाबळे महाराज



**नारी मंच उद्घाटन समारंभः**
मंचाचे कार्य विशद करतांना मा.प्राचार्य रमेशचंद्र खांडगे



**नारी मंच उद्घाटन समारंभः**
विद्यार्थिनींना प्रबोधन करतांना ह.भ.प. वाबळे महाराज



**संविधान दिनः** शपथ देतांना संस्थेचे अध्यक्ष मा. जे.डी.आंबरे पाटील



**विद्यार्थिनी व्यक्तिमत्त्व विकास शिबीर**
मा.सौ. स्मिता गुणे व्यक्तिमत्त्व विकासाचे पैलू उलगडताना



**विद्यार्थिनी व्यक्तिमत्त्व विकास शिबीर**
मा.श्रीमती सुनिता भोसले माझा जीवन प्रवास या विषयावर विद्यार्थिनींशी संवाद साधताना
खुर्चीवर विराजमान सौ. स्मिता गुणे व सौ. रजनी आंबरे



**मराठी भाषा दिनः** मार्गदर्शन करतांना 'फॅन्ड्री' फेम कलाकार मा.प्रा. संजय चौधरी



**मराठी भाषा दिनः** मार्गदर्शन करतांना मा.प्राचार्य डॉ. महेंद्र कदम

# विविध उपक्रम



**दया पवार स्मृती पुरस्कारः** दया पवार यांच्या स्मृतीस अभिवादन करतांना कलाभूषण मा. रघुवीर खेडकर




**दया पवार स्मृती पुरस्कारः** सिने अभिनेत्री मा. मधु कांबीकर पुरस्कार स्विकारतांना




**दया पवार स्मृती पुरस्कारः** प्रसिद्ध चित्रकार मा. श्रीधर आंभोरे पुरस्कार स्विकारतांना




**दया पवार स्मृती पुरस्कारः** साहित्यिक मा. संतोष खेडलेकर पुरस्कार स्वीकारतांना



**मराठी साहित्यः** कार्यक्रमाचे दीप प्रज्वलन करून उद्घाटन करतांना मराठी साहित्यिक मा.प्रा. मा.रा. लामखडे




**मराठी साहित्यः** स्वागत व प्रास्ताविक करतांना मा.प्रा. बी.एम. महाले



**हिंदी दिवस समारोहः**उद्घाटन करतांना मा.प्रा. भरत शेणकर, संस्थेचे विद्यमान सदस्य मा.एम.डी.सोनवणे, विभागप्रमुख व सहकारी प्राध्यापकवृंद




**हिंदी दिवस समारोहः** व्याख्यान देतांना प्रमुख अतिथि प्रा.भरत शेणकर

# अगस्ति कला, वाणिज्य व दादासाहेब रुपवते विज्ञान महाविद्यालय, अकोले

## निर्भयकन्या अभियान



मा.सौ. हेमलताताई पिचड, सरपंच राजूर यांचा सत्कार करतांना संस्थेचे अध्यक्ष,सेक्रेटरी,खजिनदार व प्राचार्य




मा.सौ. हेमलताताई पिचड यांच्या महाविद्यालयास भेटी प्रसंगी



कराटे प्रशिक्षक श्री. सुभाष मेंढे कराटे प्रशिक्षण देतांना




विद्यार्थिनींना पारितोषिक वितरण करतांना पोलिस उपविभागीय अधिकारी मा.सौ. स्वाती भोर

## कमवा व शिका योजना



महाविद्यालय परिसर स्वच्छतेचे काम करतांना कमवा व शिका योजनेतील विद्यार्थी



ग्रंथालयात पुस्तकांचे मांडणी करतांना कमवा व शिका योजनेतील विद्यार्थी



## यशवंतराव च.म.मुक्त विद्यापीठ




यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ अभ्यासकेंद्र कार्यालय

# विद्यापीठस्तरीय गिर्यारोहण व जीवसृष्टीचा अभ्यास शिबीर




उद्घाटनप्रसंगी मार्गदर्शन करतांना
मा.ना. मधुकररावजी पिचड साहेब व उपस्थित मान्यवर



विद्यार्थी कल्याण मंडळ पुणे विद्यापीठ कार्यक्रम संयोजक
डॉ. पंडीत शेळके मार्गदर्शन करतांना



गडांचा इतिहास, गिर्यारोहणाचे जीवनातील महत्त्व या विषयी मार्गदर्शन करतांना
डॉ. संजय चाकणे. खुर्चीवर विराजमान श्री. देवके, प्रा. रोहिदास कोल्हे, डॉ. पंडीत शेळके,
प्राचार्य रमेशचंद्र खांडगे, डॉ. विद्या अत्रेय व डॉ. अनिल देशमुख



महाविद्यालयाचे प्राचार्य रमेशचंद्र खांडगे शिबिरार्थींना मार्गदर्शन करतांना



गिर्यारोहणात सहभागी शिबीरार्थी



रतनगडाच्या एका अवघड वाटेवर...



रतनगडाच्या चढणीतील एक टप्पा पार करतांना शिबीरार्थी



समारोप प्रसंगी उपस्थित संस्थेचे विश्वस्त ॲड. प्रेमानंदजी रुपवते

# आमचा मान आमचा सन्मान



राज्यपाल मा. के. शंकरनारायण, राज्यमंत्री मा.ना. राजेंद्र गावीत व  आदिवासी विकास मंत्री मा.ना. मधुकररावजी पिचड साहेब यांचे हस्ते 'आदिवासी सेवक पुरस्कार' स्विकारतांना संस्थेचे विस्तारप्रमुख मा.श्री. मीनानाथ पांडे




संस्थेचे सदस्य मा. मधुकरराव सोनवणे यांची बहुजन शिक्षण संघाच्या विश्वस्तपदी निवड झाल्याबद्दल सत्कार करतांना संस्थेचे विश्वस्त मा.ॲड. प्रेमानंदजी रुपवते, अध्यक्ष मा. जे. डी. आंबरे पा., सेक्रेटरी मा. यशवंत आभाळे व खजिनदार मा. ॲड. के. बी. हांडे



राजस्थान विद्यापीठ (कोटा) येथे 'नॅशनल सायंटीस्ट' पुरस्कार प्रदान समारंभ प्रसंगी प्रा.डॉ. बाबासाहेब देशमुख



मा. राज्यपाल मा. के. शंकरनारायण यांच्या उपस्थितीत मा. कुलगुरु डॉ. वासुदेव गाडे व कुलसचिव डॉ. नरेंद्र कडु यांचे हस्ते 'गुणवंत शिक्षकेतर कर्मचारी पुरस्कार २०१४' स्विकारतांना सहाय्यक ग्रंथपाल श्री. प्रवीण घुले